Date – 17.06.2023

To,
The Hon. Principal,
MAM's Sumatibhai Shah Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune.

**Subject:** - 'Report of Health Check-up Camp for Warkari - 2023'

Respected Madam,

On the occasion of Aashadhi waari, Department of Swasthavritta & Yoga had organized a free health check-up and medicine distribution camp at Gadital, Hadapsar on 14.06.2023. Under the guidance of Principal, Dr. Ramesh Ujwale, Dr. Vikram Supugade, Dr. Nitesh Joshi, Dr. Yogesh Narkhede, Dr. Sandip Mali, Dr. Shankar Kemkar, Assistant AO Mr. Chandrashekhar Pawar and peon Mr. Sunil Bhandari were present for the camp from 7:00 am to 2:30 pm. To conduct the camp smoothly, 7 PG students from Swasthavritta and Yoga department, 3 PG Students from Shalakya Tantra department and 6 PG Students from Shareer Kriya department were allotted.

In check-up camp approximately 500 warkaris from all over Maharashtra were checked and free medicines were given. Majority of warkaris complained about pain in leg, back pain, joint pain, abdominal pain, cold and cough, hyperacidity, etc. In addition to the staff and PG students allotted, 2 PG students each from Swasthavritta & Yoga and Agadtantra department and 8 to 10 interns served the camp voluntarily. Dr. Sachin Aru, Dr. Rahul Dalvi, Dr. Rahul Ingole our alumni visited the camp. Dr. Nitin Dhote, alumni, PG student of Swasthavritta and Yoga department was present throughout the camp. He also donated medicines for the camp. During the camp our Secretary, Mr. Anil Gujar, Joint secretary Mr. Arun Gujar visited the camp and enquired about the camp progress, difficulties and guided the same.

We are thankful to our Secretary Mr. Anil Gujar, Joint Secretary Mr. Arun Gujar for permitting the camp and guidance throughout the camp. We are also thankful to Hon. Principal, Dr. Pranita Joshi Deshmukh and Vice Principal Dr. Kavita Deshmukh for valuable support for conducting the camp.

Attachment – Photos are attached with the report.

Head
Department of Swasthavritta & Yoga

H.O.D.
Dept. of Swasthavritta & Yoga
M.A.M's, S.S.A.M.
Hadapsar, Pune.

TRUE COPY
PRINCIPAL
M.A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune-411028

PUNE-28.

Received on 23/6/23
Sig.






TRUE COPY

PRINCIPAL
M.A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Manavidyalaya,
Hadapsar, Pune-411028






TRUE COPY

PRINCIPAL
M.A. M's. Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune-411028





TRUE COPY

PRINCIPAL
M.A. M's. Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune-411028

Post Graduate student who were appointed and present in the camp -

1. Dr. Nikesh Mante (Swasthavritta & Yoga)
2. Dr. Mrunal Wadatkar (Swasthavritta & Yoga)
3. Dr. Sayali Tanpure (Swasthavritta & Yoga)
4. Dr. Ankit Tapase(Swasthavritta & Yoga)
5. Dr. Vishal Devade (Swasthavritta & Yoga)
6. Dr. Asawari upadhye (Swasthavritta & Yoga)
7. Dr. Kajal Morande (Swasthavritta & Yoga)
8. Dr. Sharayu Gawande (Shalakya Tantra)
9. Dr. Neha Marathe (Shalakya Tantra)
10. Dr. Pooja Chavan (Shalakya Tantra)
11. Dr. Pooja Kadam (Shareer Kriya )
12. Dr. Mrunali bhoyar (Shareer Kriya )
13. Dr. Raj Jayaswal (Shareer Kriya )
14. Dr. Sneha Devkar (Shareer Kriya )
15. Dr. Pooja Mundhe (Shareer Kriya )
16. Dr. Nikhil Bhavke (Shareer Kriya )

Post Graduate student voluntarily present and worked in the camp –

1. Dr. Pratiksha Gujar (Agadtantra )
2. Dr. Shivani Kothmire (Agadtantra )
3. Dr. Ashiya Goveri (Swasthavritta & Yoga)
4. Dr. Kiran Ilay (Swasthavritta & Yoga)

TRUE COPY

PRINCIPAL
M.A. M's. Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune-411028

# महाराष्ट्र आरोग्य मंडळ, पुणे संचलित

## भीमाशंकर आदिवासी विकास प्रकल्प,

डिंभे, ता. आंबेगांव, जि. पुणे ४१०५०९

ई- मेल mamtdp@gmail.com, फोन - ९४२१०४०२३३

# महाराष्ट्र आरोग्य मंडळ, पुणे संचलित
## भीमाशंकर आदिवासी विकास प्रकल्प,

डिंभे, ता. आंबेगांव, जि. पुणे ४१०५०९

ई- मेल mamtdp@gmail.com, फोन – ९४२१९७४०२३३


जावक क्र. मआमं./भी.आ.वि.प्र./प्रशासन/२०२३-३१ दि. १४/०४/२०२३

प्रति,
मा. श्री. अनिल गुजर,
सचिव, महाराष्ट्र आरोग्य मंडळ,
माळवाडी, हडपसर, पुणे-२८

**विषय :-भिमाशंकर आदिवासी विकास प्रकल्प, डिंभे व मुक्तांगण आदिवासी मुलींचे वसतीगृह, नारोडीचा सन २०२२-२३ चा वार्षिक अहवाल.**

महोदय,

**भिमाशंकर आदिवासी विकास प्रकल्प, डिंभे व मुक्तांगण आदिवासी मुलींचे वसतीगृह, नारोडी मध्ये सन २०२२-२३ या कालावधीत झालेल्या उपक्रमांचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे देत आहोत.**

## भीमाशंकर आदिवासी विकास प्रकल्प, डिंभे :

### १. ज्ञानदा प्रशिक्षण केंद्र :



अहवाल कालावधीत ज्ञानदा प्रशिक्षण केंद्रात विविध संस्थांमार्फत **एकुण ३८ दिवसांत ११ प्रशिक्षणे/बैठका** आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये **एकुण २८३** सहभागी उपस्थित होते. या प्रशिक्षण केंद्रात घेण्यात आलेल्या प्रशिक्षणांचा व बैठकांचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे :

| अ. क्र | दिनांक | कालावधी (दिवस) | प्रशिक्षण/बैठक आयोजित करणारी संस्था | प्रशिक्षणाचे नाव | उपस्थित संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८ मे २०२२ | १ | महाराष्ट्र वृक्ष संवर्धनी, पुणे | अभ्यास सहल | १ |
| २ | २२ ते २५ मे २०२२ | ४ | युनायटेड कराटे किक बॉक्सींग असोसिएशन, पुणे | कराटे प्रशिक्षण | १८ |
| ३ | २३ मे २०२२ | १ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ | मुक्तांगण मुलाखती | २२ |
| ४ | २५ मे २०२२ | १ | केंद्रिय मत्स्य शिक्षण संस्था, मुंबई (सिआयएफई) | अभ्यास सहल | २ |
| ५ | २७ मे २०२२ | १ | महाराष्ट्र वृक्ष संवर्धनी, पुणे | अभ्यास सहल | ४ |
| ६ | ८ जुलै २०२२ | १ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ | भारत फोर्ज व महाराष्ट्र आरोग्य मंडळ गाव विकास प्रकल्प संदर्भात सहविचार बैठक | ११ |
| ७ | ६ ते ७ ऑगस्ट २०२२ | २ | श्रीमती वैद्य मॅडम ॲन्ड ग्रुप | अभ्यास सहल | ४४ |
| अ. क्र | दिनांक | कालावधी (दिवस) | प्रशिक्षण/बैठक आयोजित करणारी संस्था | प्रशिक्षणाचे नाव | उपस्थित संख्या |
| ८ | ३ ते ४ सप्टेंबर २०२२ | २ | लोकपंचायत, संगमनेर | विश्वस्त बैठक | [illegible] |
| ९ | १८ ते १९ | २ | सुरुवात एन्टरप्रायजेस, पुणे | वार्षिक मेळावा | ५५ |

True Copy
Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028

| | डिसेंबर २२ | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | २१ ते ३१ डिसेंबर २२ | ११ | जिल्हा अधिकारी कार्यालय, आपत्ती व्यवस्थापन शाखा, पुणे | आपदा मित्र | ७० |
| ११ | १ ते १२ जानेवारी २३ | १२ | जिल्हा अधिकारी कार्यालय, आपत्ती व्यवस्थापन शाखा, पुणे | आपदा मित्र | ८० |
| | एकुण | ३८ | एकुण | | २८३ |

अहवाल कालावधीत ज्ञानदा प्रशिक्षण केंद्राची वेळोवेळी साफसफाई करण्यात आली तसेच इलेक्ट्रिक दुरूस्ती, दरवाजे दुरूस्ती व इतर किरकोळ दुरूस्ती ही करण्यात आल्या.

## २. पदरवाडी जनसेट प्रकल्प :-

अहवाल कालावधीत पदरवाडी जनसेट प्रकल्प व्यवस्थित चालु असुन पदरवाडीतील एकुण १३ कुटुंबे भात भरडणे व दळण दळण्यासाठी त्याचा वापर करत आहेत.

अहवाल कालावधीमध्ये पदरवाडी ग्रामस्थांनी खालील तपशीलनुसार जनरेटर व गिरणीचा वापर केलेला आहे.

| अ.क्र | एकुण | | एकुण भात भरडणे (किलो) | एकुण दळण (किलो) |
|---|---|---|---|---|
| | तास | मिनीटे | | |
| १ | ३८ | ५० | ४४०० | २६८ |

पदरवाडी येथील जनसेटच्या दुरूस्ती व देखभाल बाबत पदरवाडी ग्रामस्थ व ट्रायडेंट कंपनीसोबत वारंवार चर्चा करण्यात येते व दुरूस्तीबाबत वार्षिक करार करण्यात येतो. योग्य वेळी जनसेटची दुरूस्तीही केली जाते. केलेल्या दुरूस्तीचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.क्र | दिनांक | तपशील | ट्रायडेंट कंपनी प्रतिनिधी |
|---|---|---|---|
| १ | ०८ मे २०२२ | भाताच्या हालरची जाळी बदलणे. | - |
| २ | ११ फेब्रुवारी २०२३ | जनरेटर सर्व्हिसिंग करणे. | श्री. श्रीनाथ लवळेकर |

## ३. आदर्शगाव प्रकल्प (फदालेवाडी-उगलेवाडी) :

**आदर्शगाव प्रकल्पातील कामांबाबत तपशील:-**

आदर्शगाव प्रकल्प फदालेवाडी-उगलेवाडी या प्रकल्पाचा कालावधी मार्च २०२२ अखेर समाप्त झाला असला तरी प्रकल्पातील बिगरगाभा कामे चालु होती व प्रकल्पाच्या मार्गदर्शक पुस्तकाप्रमाणे बहिर्गमन/समावेशन टप्प्यातील कामे बाकी होती यासंदर्भात या वर्षात खालीलप्रमाणे कामे करण्यात आली.

**बिगरगाभा कामे :-**

बिगरगाभा कामांतर्गत खालीलप्रमाणे उर्वरित कामे पुर्ण करण्यासाठी आवश्यक लोकसहभागही घेण्यात आला व अहवाल कालावधीत ही कामे उत्कृष्टरित्या पुर्ण करण्यात आली .

जळकेवाडी तळे दुरूस्ती : जळकेवाडी येथील तळ्यातील पाणी ओढण्यास सोईस्कर जावे यासाठी महाराष्ट्र आरोग्य मंडळामार्फत दोन रहाट बसविण्यात आले आहेत.

(मुक्तादेवी व मुंजोबा मंदिराचे पुर्वीचे व आत्ताचे फोटो )

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.






**बहिर्गमन/समावेशन टप्प्या :**

माहे सप्टेंबर २०२२ मध्ये आदर्शगाव प्रकल्पाच्या बहिर्गमन टप्प्यातील आवश्यक माहिती संकलित करुन राज्यस्तरीय समितीकडुन दिलेल्या फॉरमॅटनुसार माहिती भरण्यात आली.

सर्व व्यवहार पुर्ण करुन झालेल्या खर्चाचे, हिशोबांचे अंकेक्षण संस्थेचे लेखापरिक्षक श्री. कुलकर्णी सो. यांच्याकडुन करुन घेतले व लेखापरिक्षणचा अहवाल घेण्यात आला.

दि. २१ ऑक्टोबर २०२२ रोजी ग्रामपंचायत फदालेवाडी-उगलेवाडी मार्फत विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रामसभेत प्रकल्प सुरुवातीपासुन आजपर्यंत झालेल्या सर्व कामांची माहिती देण्यात आली व झालेला खर्च सादर करण्यात आला. ग्रामविकास निधीची व त्याच्या बँक खात्याची माहिती देण्यात आली तसेच हा निधी कोणत्या कामांसाठी वापरता येईल याबाबत माहिती दिली व आदर्शगाव प्रकल्प पुर्ण झाल्याचा ठराव ग्रामसभेत संमत करण्यात आला.



**आदर्शगाव प्रकल्प पुर्ण झाला असला तरी संस्थेने गावात ग्राम विकासाची कामे चालु ठेवावीत व बचत गट हिशोब व जिवणाधार उपक्रमातील फिरता निधी यावर संस्थेमार्फत नियंत्रण ठेवावे, अशी मागणी गावकऱ्यांकडुन करण्यात आली. याबाबतही ग्रामसभेत ठराव संमत करण्यात आला आहे.**

माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये आदर्शगाव प्रकल्पासंदर्भातील सर्व माहिती पुस्तके, कागदपत्रे, टेंडर फाईल, कार्यारंभ आदेश फाईल, मोजमाप वह्या, हिशोबाची पुस्तके, व्हावचर, बील फाईल इ. दस्तऐवज मा. तालुका कृषि अधिकारी सो. यांच्या कार्यालयात (मार्गदर्शक सुचनेप्रमाणे) जमा करुन प्रकल्पाचे हस्तांतरण करण्यात आले व बहिर्गमन प्रस्तावास शिफारस व संमती घेऊन त्यानंतर मा. उपविभागीय अधिकारी कार्यालय, राजगुरुनगर यांच्याकडे बहिर्गमन प्रस्ताव सादर करण्यात आला व त्यांची शिफारस घेऊन मा. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडे हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावाची एक प्रत आदर्शगाव राज्यस्तरीय समिती कार्यालय, पुणे यांच्याकडे ही सादर करण्यात आलेली आहे.

भात खाचरे बांध बंदिस्ती कामाच्या ई-निविदा पुर्वी काढण्यात आल्या होत्या. परंतु ते काम प्रकल्पातुन रद्द केल्याने या ई-निविदाही रद्द करण्यासांदर्भात पंचायत समितीकडे पत्र माहे डिसेंबर २०२२ मध्ये देण्यात आलेले आहे.

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.

**आदर्शगाव प्रकल्प बचत गट :-**

आदर्शगाव प्रकल्पात महिलांचा सहभाग वाढावा म्हणुन प्रकल्प क्षेत्रातील सर्व महिलांना बचत गटात समाविष्ट करण्यासाठी महिलांचे-१८ व पुरूषांचे-२ असे **एकुण २० बचत गट कार्यरत** आहेत. या २० गटांमध्ये एकुण २८५ सभासदांचा समावेश झालेला असुन प्रत्येक महिन्यास गटांसोबत चर्चा करून मासिक हिशोब केला जातो. त्यामध्ये कर्ज वसुली, बचत, व्याज दंड, कर्ज वाटप इ. चा सविस्तर तपशील संस्थेने तयार केलेल्या हिशोब रजिस्टर मध्ये भरण्यात येतो. त्यांचा मार्च २०२३ अखेर आर्थिक आढावा खालीलप्रमाणे.

<u>उपजिविका सुक्ष्म उद्योजकता उपक्रमः</u>

कुकुटपालन करणाऱ्या लाभार्थ्यांसाठी कावेरी जातीच्या कोंबडी पिल्लांचे बुकींग कृषि विज्ञान केंद्र, नारायणगाव याठिकाणी दि. २३ मार्च २०२२ रोजी करण्यात आले होते. सदर पिल्ले दि. १० जुन २०२२ रोजी मिळाली होती व याच दिवशी खालीलप्रमाणे सर्व लाभार्थ्यांना वाटप करण्यात आली आहेत.

| अ.क्र | लाभार्थीचे नाव | वाडी/वस्ती | वाटप केलेल्या कोंबडी पिल्लांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | दशरथ रभाजी फदाले | फदालेवाडी | १६५ |
| २ | तुकाराम नथु उगले | उगलेवाडी | १९४ |
| ३ | जिजाराम यमना शिंगाडे | तळेपठार | १९४ |
| ४ | सिताराम मारूती शिंगाडे | तळेपठार | १९४ |
| ५ | पुरूषोत्तम महादेव फदाले | फदालेवाडी | १९४ |
| ६ | योगेश जनार्दन भोईर | उगलेवाडी | १९४ |
| ७ | युवराज सिताराम उगले | उगलेवाडी | १६५ |
| ८ | समीर अंकुश फदाले | फदालेवाडी | १९४ |
| ९ | लिलाबाई नामदेव उगले | मुरमाडवाडी | १७७ |
| | एकुण | | १६७१ |

**आदर्शगाव बैठका तपशील :**

अहवाल कालावधीत आदर्शगाव समिती, ग्रामसभा व इतर बैठका घेण्यात आल्या त्या पुढील तपशीलानुसार.

| अ.क्र | दिनांक | ठिकाण | ग्रामसभा /बैठक | तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | दि. २१ ऑक्टोबर २०२२ | विठ्ठल रूख्मिणी मंदिर उगलेवाडी | विशेष ग्रामसभा | आदर्शगाव प्रकल्पांतर्गत झालेल्या संपुर्ण कामांची माहिती देणे व प्रकल्प पुर्ण झाल्याबाबतचा ठराव संमत करणे. |
| २ | दि. ८ फेब्रुवारी २०२३ | टेलेमेडिसीन दवाखाना, उगलेवाडी | बैठक | बचत गटांच्या निधी मागणी अर्जावर चर्चा करणे व उपजिविका उपक्रमांतर्गत फिरता निधी मंजुर करणे. |

**आदर्शगाव योजना राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय बैठका/ भेट :-**

| अ.क्र | दिनांक | ठिकाण | तपशील | उपस्थित संस्था प्रतिनिधी |
|---|---|---|---|---|
| १ | ४ मे २०२२ | हिवरे बाजार | मा. श्री. पोपटराव पवार यांच्या समवेत आदर्शगाव प्रकल्पातील चालु कामे व पुढील नियोजनांबाबत. | श्री. माणिक सावंत श्री. किशोर भोर व ग्रामकार्यकर्ता श्री. कोंडाजी साबळे |
| २ | ३ जुन २०२२ | हिवरे बाजार | आदर्शगाव प्रकल्प आढावा बैठक | श्री. माणिक सावंत व ग्रामकार्यकर्ता श्री. कोंडाजी साबळे |

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.

दि. १२ एप्रिल २०२२ रोजी महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे विश्वस्त श्री. अरुण गुजर सो. व श्री. युवराज साळुंखे सो. यांनी आदर्शगाव प्रकल्पास भेट देऊन चालु असलेल्या बिगरगाभा कामांची पाहणी केली तर श्री. सागर मिटकरी सो. यांनी डिंभे ऑफिसमध्ये थांबुन आदर्शगाव प्रकल्पाची बिले तपासुन बिलांमधील जिएसटी, टीडीएस भरणेबाबत तसेच कामगार विमा रक्कम, आकस्मित खर्च रक्कम इ. बाबत चर्चा केली होती. तसेच कॉन्ट्रॅक्टर चे अंतिम पेमेंट किती करावे, याबाबत ही मार्गदर्शन केले.

दि. २१ एप्रिल २०२२ रोजी आदर्शगाव संकल्प व प्रकल्पाचे मा. उपसंचालक श्री. भालेराव सो. यांनी फदालेवाडी-उगलेवाडी या गावास सदिच्छा भेट दिली होती त्यावेळी त्यांनी खोल सलग समतल चर, मजगीची कामे, उपजिविका उपक्रम सुक्ष्म उद्योजकता उपक्रम व बिगर गाभा इ. कामांची पाहणी केली. तसेच बचत गट रजिस्टर इ. पाहणी केली, टेलेमेडिसीन दवाखान्याची ही पाहणी केली.





## ४. भारत फोर्ज कं. लि. - गाव विकास कार्यक्रमः

भारत फोर्ज कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीअंतर्गत गावविकास करण्यासाठी संस्थेच्या सहकार्याने आंबेगाव तालुक्यातील मौजे ठाकरवाडी, कोळवाडी-कोटमदरा, फदालेवाडी-उगलेवाडी, गंगापुर खुर्द, चपटेवाडी, चिखली, दस्तुरवाडी, फुलवडे, बडगाव काशिंबेग-वाळुंजवाडी, नानवडे-तिरपाड, पिंगळवाडी व आमोंडी या १२ गावांमध्ये गाव विकास प्रकल्पांतर्गत कामे चालु आहेत. सदर गावांमधील करण्यात आलेल्या कामांचा अहवाल खालीलप्रमाणे :

### १) ठाकरवाडी गाव विकास प्रकल्प :

#### अ. रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड :

अहवाल कालावधीत रस्ता दुतर्फा झाडांची पाहणी करण्यात आली झाडांची वाढही चांगली आहे. अहवाल कालावधीत आवश्यकतेनुसार झाडांना पाणी घालणे, सभोवतालचे गवत काढणे, आळी करणे, ट्री गार्ड व्यवस्थित लावणे इ. कामे वेळोवेळी करण्यात आली. चिंच व जांभुळ या झाडांचे शेळी, गाय, म्हैस यांच्यापासुन संरक्षण होण्याकरिता इतर मोठया झालेल्या झाडांचे ट्रीगार्ड काढुन एकुण ३३ झाडांना एकावर असे बांधण्यात आले आहेत जेणेकरुन जनावरांना हि झाडे खाता येणार नाहीत. एकुण ५५० वृक्षलागवडी पैकी मार्च २०२३ अखेर एकुण ४८३ झाडे जिवंत आहेत.





#### आ. टेलिमेडिसीन दवाखानाः

माहे जुलै २०२२ मध्ये मौजे ठाकरवाडी येथे संस्थेच्या कार्यकर्त्यांनीभेट देऊन सरपंच व ग्रामस्थांसोबत चर्चा करुन टेलीमेडिसीन सेंटर चालु करण्याकरिता जागेची पाहणी करण्यात आली. तसेच टेलिमेडिसीन दवाखान्याकरिता आवश्यक टेबल, मांडणी, खुर्च्या, इन्व्हेटर, इंटरनेट मोडेम, पडदे इ. साहित्यांची खरेदी करण्यात आली.

डोअर स्टेप चे श्री. विकास आम्रे व श्रीमती भाग्यश्री मॅडम यांनी दि. २८ जुलै २०२२ रोजी टेलीमेडिसीन दवाखान्यास भेट दिली व दवाखान्याकरिता आवश्यक असणारे गोळ्या औषधे, मशीन

True Copy
Principal
M.A. M's; Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028

तपासणी बेड तसेच मेडिकल उपकरणे, लॅपटॉप, प्रिंटर इ. साहित्य त्यांनी पोहच केले व या दवाखान्याकरिता नेमणुक केलेल्या स्टाफला ही उपकरणे हताळण्याबाबत माहिती दिली होती.

**उद्घाटन समारंभ**

दि. २५ ऑगस्ट २०२२ रोजी टेलीमेडिसीन दवाखाना, ठाकरवाडी (चास) या दवाखान्याचे उद्घाटन मा. डॉ. लिना देशपांडे मॅडम, सिएसआर विभाग प्रमुख, भारत फोर्ज लि. पुणे यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटन प्रसंगी आंबेगाव पंचयात समितीचे मा. गटविकास अधिकारी श्री. जालींधर पठाडे, उद्योजक श्री. सचिन भोर, भारत फोर्ज सिएसआर विभागाचे श्री. जयदीप लाड सो. महाराष्ट्र अरोग्य मंडळाचे अकौंट ऑफिसर श्री. सागर मिटकरी सो. सरपंच श्री बबन बारवे, ग्रामसेवक श्री. काळे तसेच गावातील महिला व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.


या गावात टेलीमेडिसीन दवाखाना हा नाविन्यपुर्ण उपक्रम कौतुकास्पद आहे असे श्री. सचिन भोर यांनी सांगितले. मा. गटविकास अधिकारी श्री. जालींधर पठाडे यांनी या ग्रामविकास प्रकल्पाच्या कामात आवश्यक तेथे रोजगार हमी अंतर्गत मजुर उपलब्ध करून दिले जातील तसेच चालु असलेली कामे दर्जात्मक व उल्लेखनीय आहेत, असे सांगितले.

मा. डॉ. लिना देशपांडे मॅडम यांनी या कार्यक्रमात बोलतांना सांगितले की, ग्रामीण भागात पायाभुत सुविधांबरोबरच आरोग्याबाबत सुविधाही महत्वाच्या आहेत. ग्रामस्थांना वेळेत उपचार मिळाल्यास आपण अनेक आजारांना दुर ठेऊ शकतो. लहान-लहान आजारातुनच मोठे आजार बळावतात त्यापासुन बचाव करण्यासाठी तसेच गोर-गरीब सर्व सामान्य नागरिकांना वैद्यकिय सेवेचा लाभ मिळावा, यासाठी हा टेलीमेडिसीन दवाखाना चालु करण्यात आला आहे.





या टेलीमेडिसीन दवाखान्याचा फायदा गावातील सर्वच ग्रामस्थांना होत असुन ते आरोग्य तपासणीसाठी टेलीमेडीसीन दवाखान्यात येतात. वयोवृद्ध रुग्ण व लहान मुले यांच्या आरोग्याची तपासणी करण्याच्या दृष्टिने टेलिमेडिसीन स्टाफ काही ठराविक दिवसांनी विविध वाडीवस्त्यांवर भेट देऊन तेथील रुग्णांची तपासणी करतात व त्यांना आवश्यक औषधोपचार करतात. **दवाखाना सुरू झाल्यापासुन दि. १ ऑगस्ट २०२२ ते ३१ मार्च २०२३ अखेर दवाखान्यात एकुण १२१० रुग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक असणारे औषधोपचार करण्यात आले आहेत.**



डोअरस्टेप संस्थेमार्फत टेलेमेडिसीन दवाखान्यात गावातील ग्रामस्थांसाठी ऑनलाईन विविध प्रशिक्षणे/कार्यशाळा आयोजित केल्या जातात यामध्ये ऑनलाईन डॉक्टर विविध आजारांवर जनजागृती करून त्यावर प्रतिबंधात्मक उपाय, घ्यावयाची काळजी याबाबत माहिती व मार्गदर्शन करतात तसेच विविध व्यायाम प्रकार शिकविले जातात. अहवाल कालावधीत टेलेमेडीसीन दवाखाना ठाकरवाडी याठिकाणी आयोजित केलेल्या

प्रशिक्षण/कार्यशाळेचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | एकुण प्रशिक्षण/कार्यशाळा संख्या | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | ३४ | १६९ |

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.







५ सप्टेंबर २०२२ रोजी डोअरस्टेप हेल्थ सर्व्हिसेस यांच्यामार्फत **हैद्राबाद येथील डॉ. निलोफर यांनी** टेलिमेडिसीन सेंटर ला भेट देऊन पाहणी केली होती. यावेळी त्यांच्यासोबत डोअरस्टेप संस्थेचे श्री. विकास आम्रे तसेच गावचे सरपंच श्री. बबन बारवे व ग्रामस्थ इ. उपस्थित होते.

दि. १० जानेवारी २०२३ रोजी डोअरस्टेप संस्थेचे **डॉ. सुचित्रा मानकर व डॉ. पराडकर** यांनी टेलेमेडिसीन सेंटरला भेट देऊन पाहणी केली होती. तसेच दवाखान्यामार्फत पुरविल्या जाणाऱ्या सुविधांबाबत सरपंच श्री. बबन बारवे यांच्या सोबत चर्चा केली होती.


दि. १४ नोव्हेंबर २०२२ रोजी बालदिना निमित्त डोअरस्टेप मार्फत जि. प. प्राथमिक शाळेतील मुलांकरिता शाळा नंबरवाडी याठिकाणी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांकरिता संगीत खुर्ची, पोते उडी व फुगे फोडणे इ. स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. विजेत्या प्रथम तीन क्रमांकातील विद्यार्थ्यांना बक्षिस देण्यात आले होते. या स्पर्धांकरिता एकुण १०१ विद्यार्थ्यांनी उपस्थित राहुन स्पर्धेत सहभाग घेतला होता.

दि. २९ नोव्हेंबर २०२२ रोजी **डॉ. लिना देशपांडे मॅडम, सिएसआर विभाग प्रमुख,** भारत फोर्ज लि. पुणे यांनी टेलीमेडिसीन दवाखान्यास भेट देऊन पाहणी केली होती. त्यांच्या समवेत सिएसआर विभागाचे श्री. जयदिप लाड सो. महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे विश्वस्त श्री. अरूण गुजर सो. महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे अकौंट ऑफिसर श्री. सागर मिटकरी सो. तसेच जि. प. सदस्या सौ. तुलसीताई भोर, व उद्योजक श्री सचिन भोर हे ही उपस्थित होते.

**इ. सौर उर्जा प्रकल्प :**

**१ पिण्याच्या पाण्याकरिता सौर उर्जा प्रकल्प :**

मौजे ठाकरवाडी (चास) याठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी २ पाणी पुरवठा योजना चालु असुन या योजनेचा इलेक्ट्रिसिटी बील मोठ्याप्रमाणात येत होते. बील भरणा पुर्ण भरला जात नसल्याने परिणामी महावितरण कंपनीकडुन इलेक्ट्रिसिटी जोडणी वारंवार तोडली जात असे त्यामुळे येथील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी अडचणी येत होती. यावर उपाय म्हणुन ग्राम विकास प्रकल्पांतर्गत हरित गाव या संकल्पनेतुन पिण्याच्या पाण्याकरिता सौर उर्जा प्रकल्प राबविण्याचे ठरविण्यात आले व अहवाल कालावधीत ठाकरवाडी गावातील पिराचीवाडी याठिकाणी **१०.७ किलो वॅट क्षमतेचे** व कोंबडवाडी याठिकाणी **८ किलो वॅट क्षमतेचे असे २ सौर उर्जा प्रकल्प** उभारण्याचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे. ग्रामपंचायत मार्फत या प्रकल्पांच्या संरक्षणाकरिता सभोवताली तार कंपाऊंड करण्यात आले आहे. आता दोनही पाणी पुरवठा योजना या सौर प्रकल्पावर अखंडित कार्यान्वयीत आहेत.



True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028

उद्घाटन व लोकार्पण कार्यक्रम

दि. २९ नोव्हेंबर २०२२ रोजी या प्रकल्पांचे मा. डॉ. लिना देशपांडे मॅडम सिएसआर विभाग प्रमुख भारत फोर्ज लि. पुणे यांच्या हस्ते उद्घाटन करून या प्रकल्पांचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे विश्वस्त श्री. अरूण गुजर सो. महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे अकौंट ऑफिसर श्री. सागर मिटकरी सो. भारत फोर्ज लि. पुणे सिएसआर विभागाचे श्री. जयदीप लाड सो. तसेच जि. प.





सदस्या सौ. तुलसीताई भोर, व उद्योजक श्री सचिन भोर इ. मान्यवर त्याचबरोबर गावचे सरपंच श्री. बबन बारवे, उपसरपंच श्री. जालींधर काळे, ग्रामविकास अधिकारी काळे सो. तसेच ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या.

याप्रसंगी बोलताना मा. श्री. सचिन भोर यांनी सौर उर्जा प्रकल्पाकरिता ठाकरवाडी हे गाव निवडल्याबाबत व प्रकल्प कमी वेळात पुर्ण केल्याबद्दल मा. लिना देशपांडे मॅडम यांचे व भारत फोर्ज कंपनीचे आभार व्यक्त केले. भारत फोर्ज कंपनीचे मुख्य व्यवस्थापक मा. श्री. कल्याणी सो. यांना मौजे ठाकरवाडी हे गावास भेट देण्यास आणावे अशी मागणी मा. श्रीमती लिना देशपांडे मॅडम यांच्याकडे केली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात मा. श्रीमाती लिना देशपांडे मॅडम यांनी सांगितले की, हरित गाव या संकल्पनेतुन प्रथमच ठाकरवाडी या गावात सौर उर्जा प्रकल्प राबविण्यात आला असुन यापुढे गावात पिण्याच्या पाण्याकरिता इलेक्ट्रिसिटी बाबत अडचणी येणार नाहीत व मुबलक पाणी मिळेल. इतरही गावात सौर उर्जा प्रकल्प राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. आपल्या ठाकवाडी गावाची पुर्णतः आदर्शगाव म्हणुन ओळख झाल्यास मा. श्री. कल्याणी सो. आपल्या गाव भेटीला नक्कीच येतील.





या कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री नानासाहेब बारवे यांनी श्री. विजय बारवे यांनी सर्वांचे आभार मानले तर सुत्रसंचालन श्री सागर हगवणे यांनी केले.

**२ जि.प. शाळेकरीता सौर उर्जा प्रकल्प :**

गाव विकास प्रकल्पांतर्गत मौजे ठाकरवाडी हे गाव हरित गाव करण्याचे ठरले असुन गावांतील जि. प. शाळेंकरिता सौर उर्जा प्रकल्प बसविण्याचे नियोजित आहे. जि. प. शाळा नंबरवाडी येथे शाळेकरिता सौर उर्जा प्रकल्प बसविण्याकरिता माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये फौंडेशन व आर्थिंगचे काम करण्यात आले तर मार्च २०२३ मध्ये यावर **५ किलो वॅट क्षमतेचे सोलर पॅनल, १ इन्व्हर्टर व ४ बॅटरी** बसविण्यात आल्या आहेत. सर्व वायरिंगचे काम करण्यात आले असुन प्रकल्पाचे प्रात्याक्षित घेऊन प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे.

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028




**ई. फळबाग लागवड :**

फळबाग लागवड या उपक्रमांतर्गत अहवाल कालावधीत मौजे ठाकरवाडी या गावातील एकुण ३३ लाभार्थ्यांना एकुण ४०० कलमी आंब्याची रोपे वाटण्यात आली आहेत.




**उ. जमीन सपाटीकरण :**



गाव विकास प्रकल्पांतर्गत मौजे ठाकरवाडी या गावात गाव विकास प्रकल्प सुरुवात झाल्यापासुन आत्तापर्यंत एकुण १३३ शेतकऱ्यांच्या जमीन सपाटीकरणाचे काम झाले असुन त्यापासुन २१६६ गुंठे जमीन लागवडीयोग्य झाली आहे. या सर्व लाभार्थ्यांच्या जमीनीतील पिकांबाबतचा सर्व्हे अहवाल कालावधीत करण्यात आला. लाभार्थ्यांनी जमीनीत सोयाबीन, टोमॅटो, मका, शाळु यासारखी प्रामुख्याने पिके घेतली.

**ऊ. शेळीगोठा बांधकाम :**


गाव विकास प्रकल्पांतर्गत पुर्वी गोठे बांधकाम करून दिलेल्या एकुण १८ लाभार्थ्यांचा नोव्हेंबर २०२२ मध्ये सर्व्हे करण्यात आला. त्यानुसार गोठ्यातील शेळी/बोकड संख्याविषयी तपशील पुढीलप्रमाणे: (सर्वेक्षणाचा कालावधी जुलै २०२२ ते नोव्हेंबर २२)

**२) कोळवाडी-कोटमदरा गाव विकास प्रकल्प :**

**अ. रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड :**

अहवाल कालावधीत रस्ता दुतर्फा झाडांची पाहणी करण्यात आली झाडांची वाढही चांगली आहे. अहवाल कालावधीत आवश्यकतेनुसार झाडांना पाणी घालणे, सभोवतालचे गवत काढणे, आळी करणे, ट्री गार्ड व्यवस्थित लावणे इ. कामे वेळोवेळी करण्यात आली.

कोळवाडी (ठाकरवाडी) येथील एकुण २५० वृक्षलागवडी पैकी एहुण २१४ झाडे जिवंत आहेत. कोटमदरा येथील एहुण १०० वृक्षलागवडी पैकी एहुण ५५ झाडे जिवंत आहेत.



True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.

**इ. फळबाग लागवड :**

फळबाग लागवड या उपक्रमांतर्गत अहवाल कालावधीत मौजे कोळवाडी-कोटमदरा या गावातील एकुण ३८ लाभार्थ्यांना एकुण ५५० कलमी आंब्याची रोपे वाटण्यात आली आहेत.




**ई. शेळीगोठा बांधकाम :**

गाव विकास प्रकल्पांतर्गत पुर्वी गोठे बांधकाम करून दिलेल्या एकुण १३ लाभार्थ्यांचा अहवाल कालावधीत सर्व्हे करण्यात आला. त्यानुसार गोठ्यातील शेळी/बोकड संख्याविषयी तपशील पुढीलप्रमाणेः (सर्वेक्षणाचा कालावधी जुलै २०२२ ते नोव्हेंबर २२)

**३. मौजे फदालेवाडी-उगलेवाडी :**

**अ. टेलिमेडिसीन दवाखानाः**

मौजे फदालेवाडी-उगलेवाडी याठिकाणी वैद्यकीय तसेच प्राथमिक आरोग्याविषयी सुविधा गावातच उपलब्ध नसल्याने येथील ग्रामस्थांना शिनोली, घोडेगाव याठिकाणी जावे लागते. प्राथमिक आरोग्याची सुविधा गावातच उपलब्ध व्हावी यादृष्टिकोनातुन टेलेमेडिसीन दवाखाना हा नाविन्यपुर्ण उपक्रम राबविला जात आहे. यामध्ये ऑनलाईन डॉक्टर उपलब्ध असुन रूग्णांसोबत व्हिडीओ कॉलींगद्वारे चर्चा केली जाते व नर्सद्वारे रूग्णांची प्रत्यक्ष तपासणी करून आवश्यक औषधोपचार केले जातात.

या टेलीमेडिसीन दवाखान्याचा फायदा गावातील सर्वच ग्रामस्थांना होत असुन ते आरोग्य तपासणीसाठी टेलीमेडीसीन दवाखान्यात येतात. वयोवृद्ध रूग्ण व लहान मुले यांच्या आरोग्याची तपासणी करण्याच्या दृष्टिने टेलिमेडिसीन स्टाफ काही ठरावीक दिवसांनी विविध वाडीवस्त्यांवर भेट देऊन तेथील रूग्णांची तपासणी करतात व त्यांना आवश्यक औषधोपचार करतात. **अहवाल कालावधीत दि. १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ अखेर दवाखान्यात एकुण २१७५ रूग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक असणारे औषधोपचार करण्यात आले आहेत.**



डोअरस्टेप संस्थेमार्फत टेलेमेडिसीन दवाखान्यात गावातील ग्रामस्थांसाठी ऑनलाईन **विविध** प्रशिक्षणे/कार्यशाळा आयोजित केल्या जातात यामध्ये ऑनलाईन डॉक्टर विविध आजारांवर जनजागृती करून त्यावर प्रतिबंधात्मक उपाय, घ्यावयाची काळजी याबाबत माहिती व मार्गदर्शन करतात तसेच विविध व्यायाम प्रकार शिकविले जातात. अहवाल कालावधीत टेलेमेडीसीन दवाखाना, उगलेवाडी याठिकाणी आयोजित केलेल्या प्रशिक्षण/कार्यशाळेचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | एकुण प्रशिक्षण/कार्यशाळा संख्या | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | ४५ | ३१५ |

दि. १ एप्रिल २०२२ रोजी **टेलीमेडिसीन सेंटरला १ वर्ष पुर्ण** झाल्याचे औचित्य साधुन केक कापुन वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी एकुण १८ ग्रामस्थ उपस्थित होते.

दि. १३ एप्रिल २०२२ रोजी महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे विश्वस्त **श्री. अरूण गुजर सो. व श्री. युवराज साळुंखे सो.** यांनी उगलेवाडी येथील टेलीमेडिसीन सेंटरला भेट देऊन पाहणी केली होती.

दि. १९ एप्रिल २०२२ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र डिंभे मार्फत टेलीमेडिसीन सेंटर मध्ये कोविड प्रतिबंधात्मक लस देण्यासाठी कॅम्प चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी एकुण २१ व्यक्तिंना **कोरोना प्रतिबंधात्मक लस** देण्यात आली होती.

True Copy
Principal
M. A. M's. Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.

दि. ६ मे २०२२ रोजी डोअर स्टेप संस्थेचे श्री. विकास आम्रे सर यांनी भेट दिली व आवश्यक गोळ्या औषधांचा पुरवठा केला. श्री. विकास आम्रे यांनी हार्ट अटॅक आल्यानंतर करावयाचे प्राथमिक उपचार या विषयावर प्रत्याक्षिक दाखविले.



दि. १३ जुन २०२२ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, डिंभे मार्फत कोवीड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे आयोजन टेलीमेडिसीन दवाखान्यात करण्यात करण्यात आले होते. यावेळी एकुण **२३ ग्रामस्थांना कोविड प्रतिबंधात्मक लस** देण्यात आली.

दि. २८ जुलै २०२२ रोजी डोअर स्टेप संस्थेचे श्री. विकास आम्रे व श्रीमती भाग्यश्री मॅडम यांनी टेलीमेडिसीन सेंटरला भेट दिली. सेंटर करिता आवश्यक औषधे-गोळ्या पोहच केल्या तसेच दवाखान्याकरिता नविन लॅपटॉप देण्यात आला.

अमृत महोत्सवी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधुन दि. १३ ऑगस्ट २०२२ रोजी डोअरस्टेप मार्फत शालेय विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञानावर आधारीत ऑनलाईन प्रश्नोत्तरे स्पर्धा टेलीमेडिसीन दवाखाना उगलेवाडी येथे घेण्यात आली. यावेळी एकुण ६ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला होता.

दि. १५ सप्टेंबर २०२२ रोजी डोअरस्टेप हेल्थ सर्व्हिसेस यांच्यामार्फत **हैद्राबाद येथील डॉ. निलोफर** यांनी टेलिमेडिसीन सेंटरला भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत डोअरस्टेप संस्थेचे श्री. विकास आम्रे तसेच गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

दि. १४ नोव्हेंबर २०२२ रोजी बालदिना निमित्त डोअरस्टेप मार्फत जि. प. प्राथमिक **शाळेतील मुलांकरिता** शाळा उगलेवाडी याठिकाणी **विविध स्पर्धांचे आयोजन** करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांकरिता चित्रकला, पोते उडी व बादलीत चेंडू टाकणे इ. स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्या प्रथम तीन क्रमांकातील विद्यार्थ्यांना बक्षिस देण्यात आले. या स्पर्धाकरिता एकुण २८ विद्यार्थ्यांनी उपस्थित राहुन स्पर्धेत सहभाग घेतला होता.






दि. १५ नोव्हेंबर २०२२ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, डिंभे मार्फत टेलेमेडिसीन दवाखाना उगलेवाडी याठिकाणी ० ते ५ वर्ष वयोगटातील लहान मुलांना लसीकरण शिबीर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये एकुण ८ मुलांना लसीकरण करण्यात आले होते.

दि. १० जानेवारी २०२३ रोजी डोअरस्टेप संस्थेचे डॉ. सुचित्रा मानकर व डॉ. पराडकर यांनी टेलेमेडिसीन सेंटरला भेट देऊन पाहणी केली तसेच दवाखान्यामार्फत पुरविल्या जाणाऱ्या सुविधांबाबत ग्रामस्थांसोबत चर्चा केली. यावेळी गावातील माजी जि. प. सदस्या जनाबाई उगले, उपसरपंच श्री. विलास उगले, ग्रामसेवक श्री. कर्पे सो, पुरुषोत्तम फदाले, बजरंग उगले व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

### आ. जमीन सपाटीकरण :

गाव विकास प्रकल्पांतर्गत मौजे फदालेवाडी-उगलेवाडी या गावात माहे मार्च २०२१ या महिन्यात एकुण १६ शेतकऱ्यांच्या जमीन सपाटीकरणाचे काम झाले असुन त्यापासुन २००.२५ गुंठे जमीन लागवडीयोग्य झाली आहे. या सर्व लाभार्थ्यांच्या जमीनीतील पिकांबाबतचा सर्व्हे अहवाल कालावधीत करण्यात आला. लाभार्थ्यांनी जमीनीत सोयाबीन, भुईमुग, बटाटे यासारखी प्रामुख्याने पिके घेतली होती. लाभार्थ्यांच्या जमीनीत निघालेल्या पिकांच्या उत्पादनाची बाजार किंमती नुसार एकुण किंमत ६५,०००/- इतकी आहे.



### इ. फळबाग लागवड :

फळबाग लागवड या उपक्रमांतर्गत अहवाल कालावधीत मौजे उगलेवाडी फदालेवाडी या गावातील एकुण ३५ लाभार्थ्यांना एकुण **५२५ कलमी आंब्याची रोपे** वाटण्यात आली आहे.

True Copy
Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.

### ४. मौजे गंगापुर खुर्दः

#### अ. रस्ता दुतर्फा वृक्ष लागवडः

अहवाल कालावधीत रस्ता दुतर्फा झाडांची पाहणी करण्यात आली झाडांची वाढही चांगली आहे. अहवाल कालावधीत आवश्यकतेनुसार झाडांना पाणी घालणे, सभोवतालचे गवत काढणे, आळी करणे, ट्री गार्ड व्यवस्थित लावणे इ. कामे वेळोवेळी करण्यात आली.

एकुण २०० वृक्षलागवडी पैकी अहवाल कालावधी अखेर एकुण ११५ झाडे जिवंत आहेत.

#### आ. जमीन सपाटीकरण :



#### इ. फळबाग लागवड :

फळबाग लागवड या उपक्रमांतर्गत अहवाल कालावधीत मौजे गंगापुर खुर्द या गावातील एकुण ११७ लाभार्थ्यांना एकुण १४७५ कलमी आंब्याची रोपे वाटण्यात आलेली आहेत.



### ५. मौजे चिखली :

#### अ. रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड :



अहवाल कालावधीत रस्ता दुतर्फा झाडांची पाहणी करण्यात आली झाडांची वाढही चांगली आहे. अहवाल कालावधीत आवश्यकतेनुसार झाडांना पाणी घालणे, सभोवतालचे गवत काढणे, आळी करणे, ट्री गार्ड व्यवस्थित लावणे इ. कामे वेळोवेळी करण्यात आली.

एकुण १०० वृक्षलागवडी पैकी अहवाल कालावधीत एकुण १०० झाडे जिवंत आहेत.

#### आ. टेलिमेडिसीन

मौजे चिखली याठिकाणी वैद्यकीय तसेच प्राथमिक आरोग्यविषयी सुविधा गावातच उपलब्ध नसल्याने येथील ग्रामस्थांना तळेघर, डिंभे, शिनोली, घोडेगाव याठिकाणी जावे लागते. प्राथमिक आरोग्याच्या सुविधा गावातच उपलब्ध व्हावी, यादृष्टिकोनातुन टेलेमेडिसीन दवाखाना हा नाविन्यपुर्ण उपक्रम राबविला जात आहे. यामध्ये ऑनलाईन डॉक्टर उपलब्ध असुन रुग्णांसोबत व्हिडीओ कॉलींगद्वारे चर्चा केली जाते व नर्सद्वारे रुग्णांची प्रत्यक्ष तपासणी करून आवश्यक औषध उपचार केले जातात.

या टेलीमेडिसीन दवाखान्याचा फायदा गावातील सर्वच ग्रामस्थांना होत असुन ते आरोग्य तपासणीसाठी टेलीमेडीसीन दवाखान्यात येतात. वयोवृद्ध रुग्ण व लहान मुले यांच्या आरोग्याची तपासणी करण्याच्या दृष्टिने टेलिमेडिसीन स्टाफ काही ठरावीक दिवसांनी विविध वाडीवस्त्यांवर भेट देऊन तेथील रुग्णांची तपासणी करतात व त्यांना आवश्यक औषधोपचार करतात. **अहवाल कालावधीत दि. १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ अखेर दवाखान्यात एकुण १४३१ रुग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक असणारे औषधोपचार करण्यात आले आहेत.**



डोअरस्टेप संस्थेमार्फत टेलेमेडिसीन दवाखान्यात गावातील ग्रामस्थांसाठी ऑनलाईन **विविध प्रशिक्षणे/कार्यशाळा** आयोजित केल्या जातात यामध्ये ऑनलाईन डॉक्टर विविध आजारांवर जनजागृती करून त्यावर प्रतिबंधात्मक उपाय, घ्यावयाची काळजी याबाबत माहिती व मार्गदर्शन करतात तसेच विविध व्यायाम प्रकार शिकविले जातात. अहवाल कालावधीत टेलेमेडीसीन दवाखाना, चिखली याठिकाणी आयोजित केलेल्या प्रशिक्षण/कार्यशाळेचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे.

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028

| अ.क्र. | एकुण प्रशिक्षण/कार्यशाळा संख्या | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | ४५ | ३०९ |



दि. १ एप्रिल २०२२ रोजी **टेलीमेडिसीन सेंटरला १ वर्ष पुर्ण** झाल्याचे औचित्य साधुन केक कापुन वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यावेळी एकुण १८ ग्रामस्थ उपस्थित होते.

दि. २८ जुलै २०२२ रोजी डोअर स्टेप संस्थेचे श्री. विकास आम्रे व श्रीमती भाग्यश्री मॅडम यांनी टेलीमेडिसीन सेंटरला भेट दिली. सेंटर करिता आवश्यक औषधे-गोळ्या पोहच केल्या तसेच दवाखान्याकरिता नविन लॅपटॉप देण्यात आला.

अमृत महोत्सवी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधुन दि. १३ ऑगस्ट २०२२ रोजी डोअरस्टेप मार्फत शालेय विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञानावर आधारीत ऑनलाईन प्रश्नोत्तरे स्पर्धा टेलीमेडिसीन दवाखाना चिखली येथे घेण्यात आली. यावेळी एकुण ६ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला होता.

दि. १० जानेवारी २०२३ रोजी डोअरस्टेप संस्थेचे डॉ. सुचित्रा मानकर व डॉ. पराडकर यांनी टेलेमेडिसीन सेंटरला भेट देऊन पाहणी केली.

**ई. फळबाग लागवड :**



फळबाग लागवड या उपक्रमांतर्गत अहवाल कालावधीत मौजे चिखली या गावातील **एकुण ४५ लाभार्थ्यांना एकुण ९७० कलमी आंब्याची रोपे** वाटण्यात आलेली आहेत.

**६. मौजे चपटेवाडी :**

**७. मौजे फुलवडे :**

**आ. फळबाग लागवड :**



फळबाग लागवड या उपक्रमांतर्गत अहवाल कालावधीत मौजे फुलवडे या गावातील **एकुण ५३ लाभार्थ्यांना एकुण १२५० कलमी आंब्याची रोपे** वाटण्यात आली आहेत.





**८. मौजे वडगाव काशिंबेग :**

**अ. रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड :**

दि. ३० जुलै २०२२ रोजी मौजे वडगाव काशिंबेग या गावात रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात आली. या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मा.श्री. जालींधर पठारे, भारत फोर्ज लि. सिएसआर विभागाचे श्री. जयदिप लाड सो. महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे श्री. सागर मिटकरी सो. इ. मान्यवर उपस्थित होते. हे वृक्षारोपण करण्याकरिता भारत फोर्ज कं. चे एकुण ४० कर्मचारी उपस्थित होते. गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, ग्रामस्थ तसेच महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे डिंभे कार्यालयातील सर्व कर्मचारी, शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी गावातील गावठाण हद्दीपासुन ते स्मशानभुमी या रस्ता दुतर्फा [illegible] लागवड करण्यात आली व सर्व झाडांना ट्री गार्ड बसविण्यात आलेले आहेत.

True Copy
Principal
...bhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.




उर्वरित १०५ झाडांची गावच्या पश्चिम वेशीपासुन (मोरया गार्डन मंगल कार्यालय, मंचर-भिमाशंकर रस्ता) ते गावापर्यंतच्या रस्ता दुतर्फा लागवड करण्यात आली आहे. रस्ता दुतर्फा **असलेल्या झाडांची एकुण संख्या २५० झाली असुन** सर्व झाडे सुस्थितीत आहेत. या झाडांना आळी करणे, सभोवतालचे गवत काढणे इ. कामे ग्रामपंचायत मार्फत वेळोवेळी करण्यात येतात.

## आ. सार्वजनिक क्षेत्रावरील वृक्ष लागवड :



मौजे वडगाव काशिंबेग या गावातील सार्वजनिक गायरान क्षेत्रावर वृक्ष लागवड करण्याचे नियोजित होते या जागेस काटेरी तारेचे १५०० फुट लांबीचे कंपाऊंड करण्याचे काम अहवाल कालावधीत पुर्ण करण्यात आले. सदर जागेत ग्रामपंचायत मार्फत खड्डे खोदुन **एकुण २५० झाडे लावण्यात** आली आहेत. या झाडांना पाणी घालण्यासाठी ग्रामपंचायतमार्फत या जागेत नळ कनेक्शन ही घेतले आहे. ग्रामपंचायत मार्फत या झाडांमधील गवत काढणे, झाडांना पाणी देणे, आळी करणे इ. कामे वेळोवेळी केली जातात. सर्व झाडे सुस्थितीत आहेत काही मेलेल्या झाडांच्या जागी दुसरी झाडे लावण्याकरिता ग्रामपंचायत मार्फत झाडे खरेदी करण्यात आलेली आहेत.

**या गायरान क्षेत्रावर एकुण वृक्षारोपण-२५० व रस्ता दुतर्फा वृक्षारोपण-२५० असे एकुण ५०० वृक्षारोपण करण्यात आले** असुन यासाठी दि. १५ जुलै २०२२ रोजी कृषि विज्ञान केंद्र बारामती यांच्याकडुन एकुण ४१० झाडे पोहच झाली होती. उर्वरीत ९० झाडे ग्रामपंचायतीमार्फत उपलब्ध करुन लावण्यात आली होती.

## इ. फळबाग लागवड :

फळबाग लागवड या उपक्रमांतर्गत अहवाल कालावधीत मौजे वडगाव काशिंबेग वाळुंजवाडी या गावातील एकुण ५५ लाभार्थ्यांना **एकुण ५८० कलमी आंब्याची** रोपे वाटण्यात आली आहेत.




True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.

९. मौजे नानवडे-तिरपाड :

१०. मौजे निघोटवाडी-दस्तुरवाडी :

अ. शेळीगोठा बांधकाम :

गाव विकास प्रकल्पांतर्गत पुर्वी गोठे बांधकाम करून दिलेल्या एकुण ३ लाभार्थ्यांचा अहवाल कालावधीत सर्वे करण्यात आला. त्यानुसार गोठ्यातील शेळी/बोकड संख्याविषयी तपशील पुढीलप्रमाणे: (सर्वेक्षणाचा कालावधी जुलै २०२२ ते नोव्हेंबर २२)

| गोठे संख्या | सुरूवातीची संख्या | खरेदी/नविन जन्म संख्या | विक्री संख्या | विक्री किंमत | आजार- मयत संख्या | अखेर शिल्लक संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ८२ | ५९ | १२ | ८०,००० | २० | १०९ |

११. मौजे आमोंडी :

अ. रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड:

सन २०२१-२२ मध्ये लावण्यात आलेल्या रस्ता दुतर्फा झाडांची पाहणी करण्यात आली. एकुण २५० वृक्षलागवडी पैकी अहवाल कालावधी अखेर एकुण २५० झाडे जिवंत आहेत. ग्रामपंचायत मार्फत मेलेल्या झाडांच्या जागी माहे जुलै २०२२ मध्ये नवीन २० झाडे लावण्यात आली होती.

सन २०२२-२३ या वर्षात रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड करण्यासाठी दि. ५ जुलै २०२२ रोजी आमोंडी ते रामवाडी या रस्ता दुतर्फा २५० खड्डे जेसीबी च्या सहाय्याने खोदण्यात आले होते. वृक्षारोपण करण्याकरिता दि. १५ जुलै २०२२ रोजी कृषि विज्ञान केंद्र, बारामती यांच्याकडुन एकुण २६० झाडे गावात पोहच झाली होती.



दि. १० ऑगस्ट २०२२ रोजी आमोंडी येथे रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या आयुर्वेदिक महाविद्यालय हडपसर, पुणे चे एकुण ३९ विद्यार्थी व प्राध्यापक यांनी सहकार्य केले. यावेळी रस्ता दुतर्फा एकुण २०९ झाडांची लागवड करण्यात आली व त्यांना संरक्षणासाठी लोखंडी ट्री गार्ड ही बसविण्यात आले. उर्वरित ४१ झाडांची लागवड ग्रामपंचायतीच्या मदतीने करण्यात आली. अहवाल कालावधीत या उपक्रमाचा बोर्ड ही बसविण्यात आला आहे.

ग्रामपंचायत मार्फत सर्व झाडांना आळी करणे, सभोवतालचे गवत काढणे, पाणी देणे इ. कामे वेळोवेळी केली जातात. माहे, मार्च २०२३ अखेर रस्ता दुतर्फा सर्व झाडांची पाहणी करण्यात आली. एकुण ५०० वृक्षलागवडी पैकी अहवाल कालावधी अखेर एकुण ४६० झाडे जिवंत आहेत.

आ. सार्वजनिक क्षेत्रावरील वृक्ष लागवड :

मौजे आमोंडी येथे सार्वजनिक जागेत वृक्षलागवड करण्याचे नियोजित होते. या वृक्षांचे संरक्षण व्हावे, यासाठी या जागेस एकुण १०८९ फुट लांबीचे तारेचे जाळी कंपाऊंडचे काम केले आहे.



दि. २३ ऑगस्ट २०२२ रोजी या जागेत एकुण २३० वृक्ष (१५० केशरी आंबा व इतर ८० झाडे याप्रमाणे) लागवड करण्यात आली आहे. गावातील हायस्कुल शाळेचे विद्यार्थी, शिक्षक तसेच ग्रामस्थ यांच्या श्रमदानाने या वृक्षांची लागवड करण्यात आली.

या सर्व झाडांना आधार देण्याकरिता नविन काठ्या बांधणे, गवत काढणे, झाडांना पाणी देणे इ. कामे ग्रामपंचायत मार्फत वेळोवेळी करण्यात येतात. ही सर्व झाडे सुस्थितीत आहेत.

True Copy
Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028

**इ. जमीन सपाटीकरण :**

गाव विकास प्रकल्पांतर्गत मौजे आमोंडी या गावात आत्तापर्यंत एकुण ४२ शेतकऱ्यांच्या जमीन सपाटीकरणाचे काम झाले असुन त्यापासुन ५९६.१५ गुंठे जमीन लागवडीयोग्य झाली आहे. या सर्व लाभार्थ्यांच्या जमीनीतील पिकांबाबतचा सर्व्हे अहवाल कालावधीत करण्यात आला. लाभार्थ्यांनी जमीनीत सोयाबीन, भात, भुईमुग यासारखी प्रामुख्याने पिके घेतली होती.

**ई. फळबाग लागवड :**



फळबाग लागवड या उपक्रमांतर्गत मौजे आमोंडी या गावात एकुण २९०० रोपांपैकी **एकुण ११२ लाभार्थ्यांना एकुण २७५० कलमी आंब्याची** रोपे वाटण्यात आली आहेत. उर्वरित १५० रोपे सार्वजनिक क्षेत्रावरील जागेत वृक्ष लागवड करण्यात आली आहेत.

**उ. माती नाला बांध दुरूस्ती :**

मौजे आमोंडी येथील माती नाला बांध दुरूस्ती करण्याचे नियोजित होते. काम करण्यापुर्वी या तलावातील गढुळ पाणी ग्रामपंचायतीच्या मडपंपाच्या सहाय्याने काढण्याचे काम माहे, एप्रिल २०२२ करण्यात आले.

मौजे आमोंडी येथील माती नाला बांधातील गाळ काढणे व खोलीकरण रूंदीकरणाचे काम दि. २ मे २०२२ रोजी नारळ फोडुन सुरू केले होते.



जेसीबी, पॉकलेंन तसेच डंपर व ट्रॅक्टरच्या सहाय्याने खोलीकरण व रूंदीकरणाचे काम पुर्ण करण्यात आले तसेच या बांधास दगडी पिंर्चींगचे ही काम पुर्ण करण्यात आले व अहवाल कालावधीतच या बांधाची सर्व कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत. काम करण्यापुर्वी **बंधाऱ्यातील पाणी साठवणुक क्षमता १७ टीसीएम इतकी होती. हे काम पुर्ण केल्यानंतर याबंधाऱ्याची पाणी साठवणुक क्षमता ४३ टीसीएम इतकी** झालेली आहे. या बंधाऱ्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष ३०० कुटुंबांना फायदा होत आहे.






दि. २३ मे २०२२ रोजी श्री. अरूण गुजर सो. यांनी या कामास प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली होती. दि. ९ जुन २०२२ रोजी मा. डॉ. लिना देशपांडे, सिएसआर विभाग प्रमुख, भारत फोर्ज लि. यांच्या हस्ते या कामाचे लोकार्पण करण्यात आले होते, सविस्तर अहवाल पुढे दिलेला आहे.

**१२. मौजे पिंगळवाडी :**

**अ. जमीन सपाटीकरण :**

गाव विकास प्रकल्पांतर्गत मौजे पिंगळवाडी या गावात आत्तापर्यंत एकुण ३६ शेतकऱ्यांच्या जमीन सपाटीकरणाचे काम झाले असुन त्यापासुन ५२१.८२ गुंठे जमीन लागवडीयोग्य झाली आहे. या सर्व लाभार्थ्यांच्या जमीनीतील पिकांबाबतचा सर्व्हे अहवाल कालावधीत करण्यात आला. लाभार्थ्यांनी जमीनीत सोयाबीन, बटाटा, भुईमुग, चवळी यासारखी प्रामुख्याने पिके घेतली होती.

**आ. फळबाग लागवड :**



फळबाग लागवड या उपक्रमांतर्गत अहवाल कालावधीत मौजे पिंगळवाडी या गावातील एकुण १७ लाभार्थ्यांना एकुण ३४० क[illegible]ी रोपे वाटण्यात आली आहेत.

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,

**गाव विकास कार्यक्रम इतर :**

**ग्रामविकास कामे लोकार्पण कार्यक्रम :**



ग्राम विकास प्रकल्पांतर्गत **मौज आर्मोडी येथील माती नाला बांधाचे काम व कोटमदरा (ब्राम्हणवाडी) येथील पिण्याच्या पाण्याची टाकी बांधकाम या कामांचा लोकार्पण कार्यक्रम** दि. ९ जुन २०२२ रोजी आयोजित करण्यात आला होता. मा. डॉ. लिना देशपांडे, सिएसआर विभाग प्रमुख, भारत फोर्ज लि. यांच्या हस्ते या कामांचे लोकार्पण करण्यात आले.

या कार्यक्रमप्रसंगी मा. डॉ. लिना देशपांडे मॅडम यांच्या समवेत भारत फोर्ज सिएसआर विभागाचे श्री. जयदिप लाड सो., महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे अकौंट ऑफिसर श्री. सागर मिटकरी सो. प्रकल्प समन्वयक श्री. सुरेश काळे सो. व भारत फोर्ज चे कॉन्ट्रॅक्टर श्री. रवी चौधरी इ. मान्यवर उपस्थित होते.

मौजे आर्मोडी याठिकाणी प्रथमतः ढोल ताश्याच्या गजरात सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले व माती नाला बांधावर सर्वत्र फिरुन तलावाच्या पुर्ण झालेल्या कामाची पाहणी करण्यात आली. श्रीमती लिना देशपांडे मॅडम यांच्या हस्ते माहिती फलकाचे पुजन करण्यात आले. याप्रसंगी लोकार्पण कार्यक्रमाची प्रस्तावना श्री. सुरेश काळे यांनी केली. आर्मोडी ग्रामस्थांमार्फत सर्व मान्यवरांचे शाल-श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले व भारत फोर्ज कंपनी मार्फत गावात झालेल्या विविध कामांची माहिती श्री. राम फलके यांनी दिली.



यानंतर मा. डॉ लिना देशपांडे मॅडम यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन करतांना प्रामख्याने सार्वजनिक जागेत तार कंपाऊंड करुन वृक्ष लागवड करणे, फळबाग लागवड करणे, सौर उर्जेचे प्रकल्प गावात राबविणे तसेच कृषि विज्ञान केंद्र बारामती यांच्या माध्यमातुन देण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षणात सहभागी होणे याबाबत मार्गदर्शन केले. सरपंच श्री. निलेश काळे यांनी उपस्थित सर्व मान्यवर तसेच ग्रामस्थांचे आभार व्यक्त केले होते.

यानंतर मौजे कोटमदरा येथील पिण्याच्या पाण्याच्या टाकीचा लोकार्पण कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रम प्रसंगी श्रीमती डॉ. लिना देशपांडे यांच्या हस्ते टाकीचे पुजन करण्यात आले व श्री. सागर मिटकरी सो. यांच्या हस्ते नारळ फोडण्यात आला. पोलीस पाटील श्री. सुनिल डामसे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले. श्री. कोकणे गुरुजी यांनी भारत फोर्ज मार्फत गावात राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली तसेच गावातील शिवाचीवाडी व ब्राम्हणवाडी येथील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सोडविल्या बद्दल भारत फोर्ज कं. चे आभार मानले व विविध कामांबाबत कौतुक केले.





श्रीमती डॉ. लिना देशपांडे मॅडम यांनी फळबाग लागवड, तसेच कृषि विज्ञान केंद्र बारामती यांच्या माध्यमातुन देण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षणांबाबत मार्गदर्शन केले.

सरपंच सौ. शुभांगी काळे यांनी उपस्थित सर्व मान्यवर, ग्रामस्थ यांचे आभार व्यक्त केले.

**सहविचार बैठक :**

दि. ८ जुले २०२२ रोजी संस्थेच्या डिंभे येथील ज्ञानदा प्रशिक्षण केंद्रात **ग्राम विकास प्रकल्प संदर्भात सहविचार बैठक घेण्यात आली होती.** यावेळी भारत फोर्ज लि. पुणे यांच्या सिएसआर विभाग प्रमुख डॉ. लिना देशपांडे मॅडम, महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे विश्वस्त श्री. [illegible]

True Copy

Principal
M. A. M's. Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
...1 028.

फोर्ज कं सिएसआर विभागाचे श्री. जयदीप लाड सो. महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे अकौंट ऑफिसर श्री. सागर मिटकरी सो. तसेच डिंभे कार्यालयातील सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी गाव विकास प्रकल्पा करिता सर्व गावांत गाव पातळीवर समन्वय समिती स्थापन करावी, तसेच ग्रीन व्हिलेजसाठी आंबेगाव विभागात ठाकरवाडी गावाऐवजी आमोंडी हे गाव घ्यावे का, शालेय विद्यार्थ्यांकरिता पोषण आहार चालु करणे तसेच सोलर सिस्टिम इ. विषयांवर प्रामुख्याने चर्चा करण्यात आली.



**याच दिवशी दुपारी ४ वा. मा. तालुका गटविकास अधिकारी कार्यालयात** ठाकरवाडी या गावात टेलीमेडिसीन दवाखाना व प्रकल्प क्षेत्रातील गावांमध्ये सौर उर्जा उपक्रम राबविण्यासंदर्भात मिटींग झाली. सदर मिटींग करिता मा. तहसीलदार मॅडम श्रीमती रमा जोशी, मा. गटविकास अधिकारी, श्री. जालींधर पठाडे, जि. प. सदस्या मा. सौ. तुलसी भोर, मा. श्री. सचिन भोर, भारत फोर्ज लि. पुणे यांच्या सिएसआर विभाग प्रमुख डॉ. लिना देशपांडे मॅडम, महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे विश्वस्त श्री. अरूण गुजर सो. भारत फोर्ज कं सिएसआर विभागाचे श्री. जयदीप लाड सो व महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे अकौंट ऑफिसर श्री. सागर मिटकरी सो. ठाकरवाडी गावचे सरपंच श्री. बबन बारवे व उपसरपंच जालींधर काळे इ. उपस्थित होते.


मौजे ठाकरवाडी (चास) गावातील वनविभागाच्या जमीनीवर वृक्षारोपण करण्यासंदर्भात दि. २५ ऑगस्ट २०२२ रोजी **मा. उपवनसरंक्षक अधिकारी, वनविभाग जुन्नर यांच्या कार्यालयात** मिटींग घेण्यात आली होती. यावेळी मा. उपवनसरंक्षक अधिकारी श्री. सातपुते सो. यांच्या समवेत मंचर वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. रौंधळ सो. हे उपस्थित होते. या मिटींग करिता भारत फोर्ज लि. पुणे सिएसआर विभाग प्रमुख मा. डॉ. लिना देशपांडे मॅडम तसेच श्री. जयदिप लाड तर महाराष्ट्र आरोग्य मंडळामार्फत श्री. सागर मिटकरी सो. श्री सुरेश काळे सो. व श्री बाळासाहेब बेंढारी हे उपस्थित होते. या मिटींगमध्ये मौजे ठाकरवाडी येथील वनजमीनीवर वृक्षारोपण करण्यासंदर्भात चर्चा झाली व प्रथम टप्प्यात देवराई उपक्रम राबविण्याचे ठरविण्यात आले.




दि. २९ नोव्हेंबर २०२२ रोजी **मुक्तांगण वसतीगृह, नारोडी याठिकाणी** डॉ. लिना देशपांडे, सिएसआर विभागप्रमुख, भारत फोर्ज लि. पुणे यांच्यासमवेत गाव विकास प्रकल्पाविषयी मिटींग घेण्यात आली. यावेळी संस्थेच विश्वस्त श्री. अरूण गुजर सो. अकौंट ऑफिसर श्री. सागर मिटकरी सो. भारत फोर्ज कं सिएसआर विभागाचे श्री. जयदीप लाड सो. तसेच डिंभा ऑफिसचे कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीत झालेल्या कामांचा आढावा घेण्यात आला व हरित गाव उपक्रमात प्रथमतः मौजे ठाकरवाडी, आमोंडी व वडगाव काशिंबेग इ. गावाचा विचार करूयात व गावांतील इतर कामांविषयी माहे जानेवारी २०२३ मध्ये  निर्णय घेऊ असे श्रीमती लिना देशपांडे यांनी सांगितले होते.

**आढावा बैठकः-**

दि. ३ फेब्रुवारी २०२३ रोजी गाव विकास प्रकल्पातील सर्व संस्थांची गाव विकास प्रकल्प संदर्भात आढावा बैठक **भारत फोर्ज कं पुणे याठिकाणी** भारत फोर्ज कंपनीचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. बाबासाहेब कल्याणी सो. यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. या बैठकीत सर्व संस्थांमार्फत गाव विकास प्रकल्पांतर्गत केलेल्या कामे व कामांचा परिणाम याबाबत आढावा घेण्यात आला होता.





True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.

**ऑनलाईन मिटींग :-**

दि. २१ फेब्रुवारी २०२३ रोजी सन २०२३-२४ या वर्षाकरिता गाव विकास अंतर्गत अंदाजपत्रकावर **ऑनलाईन मिटींग** घेण्यात आली होती. सदर मिटींगमध्ये कोणकोणत्या उपक्रमांना प्राधान्य द्यावयाचे व किती रक्कमेपर्यंत अंदाजपत्रक बणवायचे याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली होती. सदर मिटींगसाठी भारत फोर्ज कंपनीच्या सिएसआर विभाग प्रमुख मा. डॉ. लिना देशपांडे मॅडम, सिएसआर विभागाचे समन्वयक श्री. जयदिप लाड, महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे विश्वस्त मा. अरूण गुजर सो. आर्कोट ऑफिसर श्री. सागर मिटकरी व प्रकल्प समन्वयक श्री. सुरेश काळे हे उपस्थित होते.

**हर घर तिरंगा :-**



अमृत महोत्सवी स्वातंत्र्यदिना निमित्त शासनामार्फत दि. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत **हर घर तिरंगा अभियान** राबविण्यात आले होते.



यावेळी गाव विकास प्रकल्पातील मौजे ठाकरवाडी, वाळुंजवाडी, आमोंडी, फदालेवाडी-उगलेवाडी, कोटमदरा, चिखली इ. गावांत जावून ग्रामस्थांना हर घर तिरंगा अभियानाबाबत माहिती तसेच ध्वजाचे रंग, रचना, आकरमान महत्व तसेच स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन का साजरा केला जातो याविषयी माहिती देऊन जाणिव जागृती करण्यात आली होती.


**फळबाग जिओ टॅगिंग फोटो :**

चालु वर्षात फळबाग लागवड करण्यासाठी एकुण ९ गावातील ४६१ लाभार्थ्यांना ८८४० आंबा रोपांचे वाटप करण्यात आले होते. सर्व लाभार्थ्यांनी झाडांची लागवड केली असुन दि. २३ नोव्हेंबर २०२२ व २४ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत कृषि विज्ञान केंद्र, बारामती यांचे प्रतिनिधी श्री. पोटे सो. यांनी गावांना भेटी देऊन प्रातिनिधीक एकुण ९५ लाभार्थ्यांची फळबाग लागवड पाहुन जिओ टॅग फोटो घेतले होते. यावेळी त्यांच्यासमवेत संस्थेचे कार्यकर्ते ही उपस्थित होते.





**अभ्यास सहल : कृषिक प्रदर्शन कृषि विज्ञान केंद्र, बारामती :-**



कृषि विज्ञान केंद्र, बारामती याठिकाणी कृषि विज्ञान केंद्रामार्फत दरवर्षी भारतातील सर्वात मोठे कृषिक कृषि प्रदर्शन आयोजित केले जाते.

हे कृषि प्रदर्शन आंबेगाव विभागातील शेतकऱ्यांना पाहवयास मिळावे याकरिता **शुक्रवार दि. २० जानेवारी २०२३ रोजी गाव विकास प्रकल्पांतर्गत शेतकरी अभ्यास सहल** आयोजित करण्यात आली होती. १२ गावातील २३ शेतकरी व महाराष्ट्र आरोग्य मंडळातील ८ कर्मचारी (स्टाफ) असे एकुण ३१ व्यक्ती या अभ्यास सहलीत सहभागी

True Copy
Principal
M.S. Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.

झाल्या होत्या.

या कृषि प्रदर्शनात नेदरलँड टेक्नॉलॉजीवर आधारीत आधुनिक शेती तंत्रज्ञान, शेतीतील नवनवीन बि-बियाणांचे वाण, माती परिक्षण व त्याचे फायदे, आवश्यक व योग्य प्रमाणातील नवनवीन खते, किड नियंत्रण, तणनाशक, शेतीची आधुनिक औजारे, नवनवीन जातीचे पशुधन इ. चे प्रात्याक्षिक प्लॉट व स्टॉल पहावयास मिळाले व नवनवीन गोष्टी ज्ञात झाल्या. तसेच विदेशी माती विरहीत शेती चे ही प्लॉट तंत्रज्ञान पहावयास मिळाले.




कृषि विज्ञान केंद्रातील प्रशिक्षण कक्षात सर्वांना प्रदर्शनाबाबत कृषि विज्ञान केंद्राचे श्री. गिरीश शिंदे यांनी माहिती दिली. तसेच कृषि विज्ञान केंद्रातील विविध उपक्रम, फार्मर प्रोड्युसर कं. बाबतही माहिती देण्यात आली. त्यानंतर कृषि विज्ञान केंद्राचे श्री. प्रशांत गावडे यांनी कृषि विज्ञान केंद्रामार्फत घेण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षणांची महिती दिली. तसेच मध पेट्या केव्हिकेमार्फत भाडे तत्वावर देण्यात येतात तसेच मधमाशी पालन प्रशिक्षणातील लाभार्थ्यांनी कमी किंमतीत पेट्या खरेदी ही करता येतात. कृषि विज्ञान केंद्रामील लॅबरोटरी बाबत माहिती दिली. व विविध माती परिक्षण करणे का गरजेचे असते ते सांगितले त्याच बरोबर परदेशातील शेतकरी ही माती परिक्षणासाठी माती कृषि विज्ञान केंद्रात पाठवित असल्याचे सांगितले. कृषि विज्ञान केंद्रातील विविध प्रशिक्षणाबाबत माहिती मिळविण्यासाठी त्यांनी आपला मोबाईल क्रमांक (९५६१०३३६६६) जाहीरपणे सर्वांना दिला. सर्वात शेवटी प्रकल्प समन्वयक श्री. सुरेश काळे यांनी सर्वांचे अभार व्यक्त करून या समारोप केला.



**प्रकल्प गाव भेट :-**

गाव विकास प्रकल्पातील गावांत उपलब्ध असलेला कच्चा माल व साधन सामग्री मार्फत **गावात छोटे-मोठे शेतीमाल प्रक्रिया उद्योगधंदे उभे करता येतील का?** या उद्देशाने गावांची भेट घेणे व गावांचे सर्वेक्षण करण्याच्या दृष्टिकोनातुन **कस्टमाईज्ड एनर्जी सोल्युशन**, पुणे चे संचालक श्री. नितिन आखाडे व सहकारी स्नेहा मिश्रा यांनी दि. ११ फेब्रुवारी २०२३ रोजी मौजे फुलवडे, फदालेवाडी-उगलेवाडी, आमोंडी या गावांना भेटी दिल्या व गावातील काही प्रमुख व्यक्ती तसेच शेतकरी यांच्या सोबत चर्चा करून शेतीमाल प्रक्रिया उद्योगांसंदर्भात गावांचे सर्वेक्षण केले होते.



**अंदाजपत्रक बनविण्याकरिता गाव भेटी :-**

गाव विकास प्रकल्पाचे सन २०२३-२४ चे अंजादपत्रक बनविण्याच्या उद्देशाने संस्थेच्या कार्यकर्त्यांनी दि. २२ फेब्रुवारी २०२३ रोजी कॉन्ट्रॅक्टर श्री. रवी चौधरी यांच्या समवेत मौजे आमोंडी, उगलेवाडी व ठाकरवाडी येथील पाझर तलावांची प्रत्यक्ष पाहणी केली होती. मौजे ठाकरवाडी येथे ड्रेनेज, पिंगळवाडी येथे वाडी अंतर्गत रस्ता व पाण्याची टाकी बांधकाम, दस्तुरवाडी येथे तलाव दुरूस्ती इ. संबंधी पाहणी करण्यात आली व त्याप्रमाणे अंदाजपत्रक बणविण्यात आले होते.



तसेच दि. २३ फेब्रुवारी २०२३ रोजी कॉन्ट्रॅक्टर श्री. गणेश शिंदे यांच्या समवेत मौजे ठाकरवाडी येथील

True Copy
Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.

नेबरवाडी शाळा रंगरंगोटी व जांभळेमळा शाळा रंगरंगोटी व प्लास्टर, पिंगळवाडी शाळा रंगरंगोटी, दस्तुरवाडी शाळेस पत्रा शेड व वाळुंजवाडी शाळेचे छप्पर दुरूस्ती इ. पाहणी करण्यात आली व अंदाजपत्रक बनविण्यात आले होते. सदर कामांचे व गाव विकास प्रकल्पातील इतर कामांचे एकत्रित अंदाजपत्रक दि. २७ फेब्रुवारी २०२३ रोजी ई-मेल द्वारे पाठविण्यात आले आहे.

## ५. मुंबई स्थित देणगीदार - जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना मदत :

मुंबईस्थित देणगीदार मा. श्री. सतीश, श्री. हरी व श्री. बाला यांनी सन २०२० व २०२१ मध्ये काही शाळांना भेटी देऊन काही साहित्य तसेच काही दुरूस्तीची कामे मंजुर केली होती. त्यापैकी अहवाल कालावधीत खालील काही शाळांना साहित्य देण्यात आले आहे.







यापुर्वी साहित्य दिलेल्या काही निवडक शाळांना दि. १७ सप्टेंबर २०२२ रोजी श्री. सतीश, व श्री. हरी यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. तसेच त्यांनी त्यावेळी चालु असलेल्या इतर (बेंच दुरूस्ती, कपाटे इ.) कामांची पाहणी केली होती.

इतर :

दि. २२ एप्रिल २०२२ रोजी संस्थेच्या नविन डॉ. दादा गुजर माता-बाल रूग्णालयाचे उद्घाटन मा. डॉ. मोहनजी भागवत, प.पू. सरसंघचालक, रा. स्व. संघ यांच्या हस्ते करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन श्री. बाबासाहेब कल्याणी, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक भारत फोर्ज लि. व सौ. सुनिता कल्याणी हे उपस्थित होते. या कार्यक्रम प्रसंगी डिंभे ऑफिसमार्फत श्री. सुरेश काळे हे उपस्थित होते.

दि. ६ जुलै २०२२ रोजी कृषि विज्ञान केंद्र बारामतीचे श्री. जोशी सो. यांनी डिंभे कार्यालयास भेट दिली होती यावेळी ग्रामविकास प्रकल्पांतर्गत लावण्यात येणाऱ्या फळबागेविषयी चर्चा केली तर वडगाव काशिंबेग व आमोंडी येथील रस्ता दुतर्फा व गायरान क्षेत्रावरील लावण्यात येणाऱ्या झाडांची यादी घेतली होती. त्यांनतर त्यांच्याकडुन दि. १५ जुलै २०२२ रोजी वडगाव काशिंबेग करिता ४१० झाडे तर अमोंडी करीता २६० झाडे अशी एकुण ६७० झाडे पोहच झाली होती.

दि. १३ जुलै २०२२ रोजी श्री. सुरेश काळे, बाळासाहेब बेंढारी व सोमा केंगले यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय पेठ याठिकाणी वन परिक्षेत्र अधिकारी श्री. खंदाडे सो. यांची प्रत्यक्ष भेट घेवुन ठाकरवाडी येथे वन जमीनीवर वृक्षारोपण करण्याच्या दृष्टीने प्राथमिक चर्चा केली होती.

दि. १९ जुलै २०२२ रोजी श्री. सुरेश काळे व श्री. किशोर भोर यांनी वन अधिकारी कार्यालय जुन्नर यांच्या कार्यालयास भेट देऊन डिएफओ श्री. अमोल सातपुते सो. यांच्या सोबत मौजे ठाकरवाडी (चास) येथील वन जागेत वृक्षारोपण करण्यासंदर्भात चर्चा झाली होती व चर्चेअंती वनअधिकारी, भारत फोर्ज, मआमं यांची एकत्रित बैठक घेण्यासाठी तारीख देऊ असे त्यांनी सांगितले होते.

दि. २३ जुलै २०२२ रोजी वडगाव काशिंबेग येथे जि.प. शाळेच्या नविन इमारतीचे तसेच गावातील इतर विविध विकास कामांचे उद्घाटन करण्यासाठी मा. श्री. दिलीपराव वळसे पाटील, आमदार आंबेगाव हे उपस्थित होते सदर कार्यक्रमास संस्था प्रतिनिधी म्हणुन श्री. सुरेश काळे हे उपस्थित होते.

अहवाल कालावधीत कार्यालयाच्या नदीवरील मोटार करिता नविन इलेक्ट्रिसिटी मीटर खरेदी करण्यात आला होता. त्यावेळी सदर मीटर महावितरण मंचर कार्यालयात चेक [illegible] नंतर मोटारीस बसविण्यात आला आहे.

True Copy
Principal
M.A.M's Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028

उशलेवाडी येथील कलमजामाता तलाव दुरूस्ती करण्यासंदर्भात पुर्वी रोटरी क्लब, पुणे यांच्याकडे प्रस्ताव देण्यात आला होता. रोटरीक्लब हा उपक्रम राबविण्यास इच्छुक असुन त्यांना आवश्यक असणारी माहिती तसेच तलावाचे फोटो अहवाल कालावधीत त्यांच्याकडे पाठविण्यात आले होते.

स्वातंत्र्य दिनाचा अमृत महोत्सवी दिनानिमित्त हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत शासनाने अवाहन केल्याप्रमाणे दि. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत दररोज कार्यालयात ध्वजारोहण करण्यात आले होते. तसेच दि. **१५ ऑगस्ट २०२२ रोजी संस्थेचे संस्थापक डॉ. दादा गुजर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले होते.**



**न्यु इंग्लिश स्कुल, गोहे** या शाळेने विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणाऱ्या एन एम एम एस व स्कॉलरशीप पुस्तकांचे ३ संच मिळावे यासाठी अर्ज केला होता. यासंदर्भात श्री. सागर मिटकरी यांनी निवेदिता मडकीकर फौंडेशन यांच्याकडे सदर अर्ज देऊन चर्चा केली व दि. **२८ सप्टेंबर २०२२ रोजी निवेदिता मडकीकर फौंडेशन, पुणे यांच्या आर्थिक मदतीने सदर पुस्तकांचे संच शाळेस देण्यात आले होते.**

कॅनरा बँक, शाखा आपटाळे, जुन्नर या बँकेने गारोडीनाथ धान्यबँक, आंबे या बँक खात्याचे केवायसी पुर्तता करण्यासाठी सुचना केली होती त्यानुसार या धान्यबँकेच्या खात्यावरील सहीचे अधिकार असलेले श्री उदयसिंह चौधरी व इतर ग्रामसभ्यांची कागदपत्रे सादर करून केवायसी पुर्तता माहे सप्टेंबर २०२२ मध्ये करण्यात आली आहे.

अहवाल कालावधीत श्री. रांका ब्रदर्स यांच्या जाहीरातीला अनुसरून मा. सचिव श्री. अनिल गुजर सो. यांच्या सुचनेनुसार पदरवाडीसाठी सोलर स्ट्रीट लाईट मागणीचे विनंतीपत्र श्री. उदयसिंह चौधरी यांनी तयार करून पाठविले होते. त्यावेळी आढावा घेण्यासाठी श्री. उदयसिंह चौधरी यांनी फोन केला असता त्यांचा सकारात्मक प्रतिसाद असल्याचे समजले होते. परंतु अद्याप त्यांनी याविषयी काहीही कळविलेले नाही.

आदर्शगाव प्रकल्पाचे प्रत्येक महिन्याचे आपले आदर्शगाव हे मासीक प्रकाशित होत असते. माहे ऑगस्ट २०२२ च्या मासिकात आदर्शगाव फदालेवाडी उगलेवाडी गावातील **टेलीमेडिसीन दवाखाना एक अभिनव उपक्रम** हा लेख छापुन आला होता.

संस्थेच्या जुन्या जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व **शाश्वत संस्थेच्या संस्थापक श्रीमती कुसुमताई कर्णिक यांचे दि. २ नोव्हेंबर २०२२ रोजी वृद्धपकाळाने पुणे याठिकाणी निधन झाले.** त्यांच्या दशक्रिया विधीचा कार्यक्रम दि. ११ नोव्हेंबर २०२२ रोजी मौजे आहुपे याठिकाणी घेण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी संस्थेचे श्री. सुरेश काळे, बाळासाहेब बेंढारी, उदयसिंह चौधरी, किशोर भोर, माणिक सावंत, अनंता पारधी, सोमा केंगले इ. कार्यकर्ते उपस्थित होते.

संस्थेच्या डिंभे ऑफिस मधील जनरेटर सर्व्हिसिंग बाबत अहवाल कालावधीत ट्रायडेंट कंपनीकडुन कोटेशन मागवुन घेण्यात आले व मंजुर करून ऑर्डर देण्यात आली होती. दि. ११ फेब्रुवारी २०२३ रोजी डिंभे कार्यालयातील जनरेटरचे सर्व्हिसिंग करण्यात आले. सर्व्हिसिंग करिता ट्रायडेंट कंपनीचे श्री. श्रीनाथ लवळेकर हे उपस्थित होते.

श्री. उदयसिंह चौधरी हे मे २०२३ अखेर सेवानिवृत्त होत असल्याने प्रकल्पातील जुन्या गावातील ग्राम विकास समिती, धान्यकोष, बचत गट यांच्या बँक खात्यावरील श्री. उदयसिंह चौधरी यांच्या सहीचे अधिकार काढुन टाकण्याबाबत संस्थेमार्फत सांगण्यात आले होते, त्यानुसार बँक खात्यावरील सहीचे अधिकार काढुन घेण्यासंदर्भात काम चालु केले असुन त्यासाठी संदर्भीत खात्यांचे केवायसी पुर्तता करण्याचे काम चालु आहे.

दि. १७ जानेवारी २०२३ रोजी इंटरनॅशनल इन्स्टिट्युट फॉर अप्लाईड सिस्टिम ॲनालिसीस ऑस्ट्रिया, भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था पुणे व सोपेकॉम, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने उजनी भीमा खोऱ्यातील अन्न, पाणी व जैवविविधता यातील परस्पर संबंधाचा अभ्यास या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेस आपल्या संस्थेला ही आमंत्रित केले होते. कार्यशाळेकरिता श्री. उदयसिंह चौधरी व माणिक सावंत हे उपस्थित होते.

True Copy
Principal
M's Sumatibhai Shah Ayurved Mahavidyalaya, Hadapsar, Pune-411028.

दि. २४ जानेवारी २०२३ रोजी द नेचर कन्सर्वेन्सी या संस्थेमार्फत पुणे येथे घोड रिव्हर वॉटर फंड स्टॉकहोल्डर एन्गेजमेंट या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेस आपल्या संस्थेलाही आमंत्रित केले होते. या कार्यशाळेकरिता श्री. उदयसिंह चौधरी व किशोर भोर हे उपस्थित होते

दि. २६ जानेवारी २०२३ रोजी कार्यालयात ध्वजारोहण करून प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

दि. २ मार्च २०२३ रोजी कार्यालयात डॉ. दादा गुजर यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुण्यतिथी साजरी करण्यात आली. व डॉ. दादा गुजर स्मृती पुरस्कार वितरण कार्यक्रमास सर्व कार्यकर्ते वानवडी, पुणे याठिकाणी उपस्थित होते. या कार्यक्रमात सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार सौ. मंगल शहा, पंढरपुर तर आरोग्य क्षेत्रातील पुरस्कार पुणे नेत्रसेवा प्रतिष्ठाण, पुणे यांना प्रदान करण्यात आला आहे.

कार्यालय परिसरातील स्वच्छता, गवत काढणे, खुरपणी करणे झाडांना पाणी देणे इ. कामे वेळोवेळी चालु आहेत.

Maharashtra Arogya Mandal F-230 (Poona)

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.

# मुक्तांगण आदिवासी मुलींचे वसतीगृह, नारोडी

**१. शैक्षणिक :**

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात खालील तपशीलनुसार एकुण ६४ मुली वसतीगृहात राहुन शिक्षण घेत आहेत.

| इयत्ता | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी | ९ वी | १० वी | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मुलींची संख्या | ७ | १५ | ५ | १२ | १० | १५ | ६४ |

**वार्षीक निकाल : (इ. ५ वी ते इ. ९ वी)**

माहे एप्रिल २०२२ मध्ये इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांची वार्षीक परिक्षा मुक्तादेवी विद्यालय नारोडी मार्फत घेण्यात आली होती. दि. ३ मे २०२२ रोजी श्री. मुक्तादेवी विद्यालय, नारोडीचा इयत्ता ५ वी ते ९ वी चा वार्षीक निकाल (सन २०२१-२२) जाहीर करण्यात आला. आपल्या वसतीगृहातील इ. ५ वी ते ९ वी पर्यंत एकुण ५९ मुली शिकत होत्या. सर्व मुली उत्तीर्ण झालेल्या आहेत. इयत्तेनुसार निकाल तपशील पुढीप्रमाणे :

| अ.क्र. | इयत्ता | एकुण मुलींची संख्या | उत्तीर्ण मुलींची संख्या | अनुत्तीर्ण मुलींची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | ५ वी | १३ | १३ | 0 |
| २ | ६ वी | ७ | ७ | 0 |
| ३ | ७ वी | १३ | १३ | 0 |
| ४ | ८ वी | १० | १० | 0 |
| ५ | ९ वी | १६ | १६ | 0 |
| एकुण | | ५९ | ५९ | 0 |

इ. ९ वी तील कु. मंगल विलास किर्वे हिने ८०.५ टक्के मिळवुन विद्यालयात तिसरा क्रमांक मिळविला.

**इयत्ता १० वी निकाल :**

सन २०२१-२२ मधील इ. १० वी च्या मुलींचा एससीसी बोर्ड परिक्षा १५ मार्च २०२२ ते ४ एप्रिल २०२२ या कालावधीत घेण्यात आली होती. एकुण १६ मुलींपैकी १५ मुली या परिक्षेसाठी बसलेल्या होत्या १ मुलगी कु. दिव्या पांडुरंग सोळस्कर ही मुलगी आपल्या मुळ गावी बीड येथे गेली असल्याने ती गैरहजर होती. सदर मुलींचा निकाल दि. १७ जुन २०२२ रोजी जाहीर झाला. वसतीगृहातील १६ पैकी एकुण १५ मुली उत्तीर्ण झाल्या असुन त्यांचा निकाल खालीलप्रमाणे

| अ. क्र. | नाव | मराठी | हिंदी | इंग्रजी | गणित | विज्ञान | समाज शास्त्र | एकुण गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आकांक्षा भिमाजी केसकर | ८६ | ८६ | ८३ | ६० | ७० | ८५ | ४१० | ८२.०० |
| २ | अश्विनी रघुनाथ सुपे | ७० | ८१ | ७२ | ६७ | ८९ | ७९ | ३९४ | ७८.८० |
| ३ | दिपाली एकनाथ भारमळ | ६५ | ७१ | ७२ | ६६ | ८७ | ८८ | ३८४ | ७६.८० |
| ४ | वैष्णवी लक्ष्मण भारमळ | ७० | ७२ | ५९ | ६२ | ८७ | ८३ | ३७९ | ७५.८० |
| ५ | अपेक्षा नामदेव मसळे | ६८ | ७६ | ७५ | ५९ | ८४ | ७४ | ३७७ | ७५.४० |
| ६ | शितल दुंदा मसळे | ७१ | ७२ | ७१ | ६४ | ७४ | ८३ | ३७१ | ७४.२० |
| ७ | राजश्री रामचंद्र गवारी | ६३ | ७४ | ६६ | ५७ | ८६ | ७८ | ३७० | ७४.०० |
| ८ | कविता विलास शेळके | ७८ | ६९ | ७२ | ६६ | ७० | ६९ | ३५८ | ७१.६० |
| ९ | अश्विनी ज्ञानेश्वर पारधी | ६० | ६२ | ७० | ६२ | ७७ | ६७ | ३३८ | ६७.६० |
| १० | दिप्ती दत्तात्रय लोहकरे | ६३ | ५७ | ४९ | ६२ | ८१ | ७१ | ३३४ | ६६.८० |

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | पायल संजय मसळे | ६३ | ५३ | ५५ | ६३ | ८४ | ६९ | ३३४ | ६६.८० |
| १२ | हर्षदा गिरजु वांगट | ६० | ७० | ६१ | ६२ | ७१ | ७० | ३३४ | ६६.८० |
| १३ | निता रघुनाथ करवंदे | ४४ | ५५ | ४७ | ५८ | ७० | ६१ | २९१ | ५८.२० |
| १४ | निकिता लक्ष्मण केंगले | ४८ | ५१ | ४९ | ५७ | ६९ | ६३ | २८९ | ५७.८० |
| १५ | निकिता नाना म्हसकर | ४१ | ४८ | ४४ | ५४ | ६३ | ५६ | २६८ | ५३.६० |
| १६ | दिव्या पांडुरंग सोळस्कर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०० |

**नविन प्रवेश :**

सन २०२२-२३ या वर्षात नविन मुलींना प्रवेश देण्याच्या उद्देशाने दि. २३ मे २०२२ रोजी मुलींच्या पालकांच्या मुलाखती ज्ञानदा प्रशिक्षण केंद्र, डिंभे याठिकाणी घेण्यात आल्या. सदर मुलाखती घेण्यासाठी मा. श्री. अरूण गुजर सो. उपस्थित होते. यावेळी एकुण २२ मुलींच्या व पालकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यापैकी खालील मुलींची निवड करून मुलींना वसतीगृहात प्रवेश देण्यात आला आहे.

| अ.क्र. | मुलींचे नाव | गाव | इयत्ता |
|---|---|---|---|
| १ | प्रिती सोपान गवारी | मंदोशी | ५ वी |
| २ | आकांक्षा जयप्रकाश भोकटे | जांभोरी | ५ वी |
| ३ | साक्षी रामा उंडे | चिखली | ५ वी |
| ४ | अनुष्का देवेंद्र केंगले | जांभोरी | ५ वी |
| ५ | ऋतुजा बाळु लोहकरे | राजपुर | ५ वी |
| ६ | खुशी दत्तात्रय पारधी | ठाकरवाडी (चास) | ५ वी |
| ७ | सिध्दी नारायण पारधी | महाळुंगे पाटण | ५ वी |
| ८ | अनुजा निवृत्ती जोशी | तांबे | ६ वी |
| ९ | आरती दत्तात्रय केंगले | जांभोरी | ६ वी |
| १० | सविता सखाराम बोकड | कोळवाडी | ९ वी |

**शैक्षणिक इतर बाबी :**

वसतीगृहातील शैक्षणिक दर्जा सुधारावा या उद्देशाने घेण्यात येणाऱ्या गणित व इंग्रजी विषयाच्या जादा तासिका दि. १ ऑगस्ट २०२२ पासुन इयत्तेनुसार सुरू करण्यात आल्या आहेत. गणित विषयाकरिता सौ. श्वेता भुते यांची तर इंग्रजी विषयाकरिता सौ. सुजाता हुले या शिक्षिकांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

श्री. मुक्तादेवी विद्यालयामार्फत दि. १४ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर २०२२ या दरम्यान इ. ५ वी ते इ. १० वीच्या विद्यार्थ्यांची चाचणी परिक्षा-१ घेण्यात आली. सर्व मुली परिक्षेसाठी उपस्थित होत्या.

दि. २० सप्टेंबर २०२२ रोजी हिंदी दिनानिमित्त विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत वसतीगृहातील एकुण १० मुलींनी सहभाग घेतला होता. वसतीगृहातील कु. मंगल विलास किर्वे या मुलीचा या स्पर्धेत प्रथम क्रमांक आला.

दि. २२ सप्टेंबर २०२२ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त वसतीगृहात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एकुण १५ मुलींनी सहभाग घेतला होता. विदयालयातही निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या होत्या यातही वसतीगृहातील मुलींनी सहभाग घेतला होता. तसेच कर्मवीर जयंती उत्सहात झांज पथकातही एकुण १५ मुलींनी सहभाग घेतला होता.

दि. ५ डिसेंबर २०२२ ते १५ डिसेंबर २०२२ या कालावधीत विद्यालयामार्फत इ. १० वी ची गुरूकुल सराव परिक्षा घेण्यात आली.

तसेच २१ डिसेंबर २०२२ शासनामार्फत इ. ८ वी तील विद्यार्थ्यांची एनएमएमएस परिक्षा घेण्यात आली. वसतीगृहातील इ. ८ वी तील एकुण ७ मुली परिक्षाकेंद्र-जनता विद्यालय, घोडेगाव याठिकाणी परिक्षेकरिता उपस्थित होत्या.

दि. २३ डिसेंबर २०२२ रोजी इ. १० वी, दि. २६ डिसेंबर २०२२ रोजी इ. ९ वी, दि. २९ डिसेंबर २०२२ रोजी इ. ६ वी तील विद्यार्थ्यांची पालक मिटींग श्री. मुक्तादेवी विद्यालयात

True Copy
Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028

आयोजित करण्यात आली होती. यावेळी विद्यालयीन परिक्षा व शिष्यवृत्ती परिक्षांबाबत पालकांना मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांच्या अभ्यासाबाबत चर्चा करण्यात आली.

दि. ७ जानेवारी २०२३ रोजी इ. ९ वी व दि. ९ जानेवारी २०२३ रोजी इ. ७ वी ची पालक मिटींग मुक्तादेवी विद्यालयात घेण्यात आली. या मिटींग मध्ये मुलींच्या अभ्यासाबाबत आढावा घेण्यात आला.

इ. ९ जानेवारी २०२३ ते १५ जानेवारी २०२३ या कालावधीत विद्यालयामार्फत इ. १० वी ची सराव परिक्षा तर दि. १९ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत मुख्य सराव परिक्षा घेण्यात आली. दि. १४ जानेवारी २०२३ रोजी इ. ५ वी ते इ. ९ वी पर्यंत च्या मुलींची कर्मवीर प्रबोधिनीची परिक्षा विद्यालयामार्फत घेण्यात आली.

दि. २३ जानेवारी २०२३ रोजी चास येथील शाळेत विज्ञान प्रदर्शन आयोजित केले होते. हे प्रदर्शन पाहण्यासाठी सर्व मुलींना नेण्यात आले होते.

दि. २४ जानेवारी २०२३ रोजी विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये सर्व मुलींना सहभाग घेतला होता.

मुक्तादेवी विद्यालय, नारोडी मार्फत दि. ६ फेब्रुवारी २०२३ ते १५ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत रोजी इ. १० वी ची सराव परिक्षा घेण्यात आली.

दि. १० फेब्रुवारी २०२३ रोजी इ. ५ वी शिष्यवृत्ती परिक्षेकरिता वसतीगृहातील २ मुली (आकांक्षा भोकटे व प्रिती गवारी) श्रीमती वत्सला तळपे यांच्या सोबत लांडेवाडी येथे पाठविण्यात आल्या होत्या.

मुक्तादेवी विद्यालय, नारोडी मार्फत दि. १५ फेब्रुवारी २०२३ ते १६ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत रोजी इ. ५ वी ते ९ वी च्या मुलींची चाचणी परिक्षा (क्र. ३) घेण्यात आली.

इ. १० वी ची एसएससी बोर्ड परिक्षा दि. २ मार्च २०२३ पासुन सुरू झाली असुन इ. १० वी एकुण १५ मुलींना परिक्षे करिता जनता विद्यालय, घोडेगाव याठिकाणी नेण्यात आले. दि. २५ मार्च २०२३ रोजी इ. १० वीतील मुलींचा परिक्षा संपल्याने त्यांना आपआपल्या पालकांसोबत घरी पाठविण्यात आले.

२. आरोग्य तपासणीः



दि. ४ जुलै २०२२ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, नारोडी येथील डॉक्टरांच्या मदतीने वसतीगृहातील मुली व स्टाफ अशा एकुण ७० जणांची कोरोना अॅन्टीजन टेस्ट करण्यात आली. त्यापैकी ७ मुलींची टेस्ट पॉझीटीव्ह आल्याने त्याच दिवशी त्यांच्या पालकांना बोलावुन त्यांना घरी सोडण्यात आले तर काही मुलींना सर्दी, खोकला, घसादुखी इ. आजार असल्याने सर्व मुलींना दि. ५ जुलै २०२२ रोजी आपआपल्या घरी सोडण्यात आले होते.

मुलींच्या आरोग्याविषयी वेळोवेळी आढावा घेण्यात आला व दि. १७ जुलै २०२२ सर्व मुलींना वसतीगृहात परत बोलावण्यात आल्या होत्या.

दि. २७ जुलै २०२२ रोजी वसतीगृहातील २० मुलींना कोरोना प्रतिबंधात्मक लसीचा दुसरा डोस प्राथमिक केंद्र, लांडेवाडी यांच्यामार्फत देण्यात आला.

दि. १६ ऑगस्ट २०२२ रोजी डॉ गोमती मॅडम यांनी वसतीगृहातील एकुण ४० मुलींच्या आरोग्याची तपासणी केली व आजारी मुलींना आवश्यकतेनुसार गोळ्या औषधे लिहुन दिली.

दि. १७ नोव्हेंबर २०२२ रोजी वसतीगृहातील एकुण ६ मुलींची हिमोग्लोबीन तसेच कॅल्शियम तपासणी ग्रामीण रुग्णालय मंचर येथे करण्यात आली. व सदर मुलींना चवनप्राश व मल्टीविटामीन च्या गोळ्या देण्याचा निर्णय घेण्यात आला.

दि. ११ डिसेंबर २०२२ रोजी डॉ. गोमती मॅडम यांनी सर्व मुलींच्या आरोग्याची तपासणी केली व १० आजारी मुलींना गोळ्या-औषधे लिहुन दिली.

दि. १३ डिसेंबर २०२२ रोजी इ. १० वी तील एकुण १५ मुलींना गोवर प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात आले.

दि. २१ फेब्रुवारी २०२३ तारखेला डॉ. गोमती काण्णव यांनी वसीगृहास भेट देऊन कु. विक्षा खरात या मुलींची तपासणी करुन मुलींसोबत आरोग्य विषयक चर्चा केली.

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.

३. **वसतीगृहास भेट व देणगी :**

दि. १२ एप्रिल २०२२ रोजी मा. **श्री. अरूण गुजर सो. श्री. युवराज साळुंखे सो. व श्री. सागर मिटकरी सो.** यांनी वसतीगृहास भेट देऊन पाहणी केली. तसेच वसतीगृह कर्मचाऱ्यांसोबत चर्चा केली. यावेळी इन्व्हर्टर व सोलर वॉटर सिस्टम इ. दुरूस्तीबाबत पाहणी केली.

दि. २३ मे २०२२ रोजी मा. **श्री. अरूण गुजर सो.** यांनी वसतीगृहास भेट देऊन परिसराची पाहणी केली.

दि. ६ ऑगस्ट २०२२ रोजी **श्री. राजेंद्र बहाळकर व श्रीमती पद्मश्री बैद्य मॅडम** यांनी वसतीगृहाला सदिच्छा भेट दिली व मुलींसोबत चर्चा केली.

दि. १० ऑगस्ट २०२२ रोजी महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे **सुमतीभाई शाह आयुर्वेद महाविद्यालयातील ४० विद्यार्थी** तसेच शिक्षकांनी वसतीगृहास भेट दिली. यावेळी मा. डॉ. अमित सर यांनी मुलींना सुरेख गाणे म्हणुन दाखविले. तर वसतीगृहातील कु. मंगल किर्वे हिने संविधान विषयावर तर कु. स्नेहल तुरे हिने माय या विषयावर गाणे सादर केले.

दि. १३ ऑगस्ट २०२२ रोजी **जग्वार कंपनीचे मा. सारंग सर** यांनी सहकुटुंब वसतीगृहास भेट दिली. त्यांनी मुलींना प्रत्येकी १ सफरचंद, पेन, पेन्सिल, खोडरबर, बेल्ट इ. वस्तु भेट म्हणुन दिल्या.

दि. २९ नोव्हेंबर २०२२ रोजी संस्थेचे विश्वस्त **मा. श्री. अरूण गुजर सो. अकौंट ऑफिसर श्री. सागर मिटकरी सो. भारत फोर्ज लि. पुणे सिएसआर विभाग प्रमुख डॉ. लिना देशपांडे मॅडम व सिएसआर विभागाचे श्री. जयदीप लाड सो.** इ. मान्यवरांनी वसतीगृहास भेट देऊन पाहणी केली.

संस्थेच आकौंट आफिसर **श्री. सागर मिटकरी यांची कन्या मैत्रेयी हिच्या वाढदिवसानिमित्त** दि. ८ डिसेंबर २०२२ रोजी श्री. सागर मिटकरी सो. यांच्यामार्फत वसतीगृहातील सर्व मुलींना गोड जेवण देण्यात आले तर दि. १५ जानेवारी २०२३ रोजी संस्थेच कर्मचारी **श्री उदयसिंह चौधरी यांचा मुलगा श्री. यदुनाथ चौधरी यांचा वाढदिवस** वसतीगृहात साजरा करण्यात आला व वाढदिवसानिमित्त सर्व मुलींना गोड जेवण देण्यात आले.

दि. ६ मार्च २०२३ रोजी इ.१० वी तील मुलींचा निरोप समारंभ वसतीगृहात करण्यात आला. या मुलींमार्फत वसतीगृहास छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा भेट म्हणुन देण्यात आली.

४. इतर :

प्रशिक्षणे :

तसेच माहे, ऑगस्ट २०२२ पासुन अतिरिक्त कौशल्य म्हणुन **शिवणकामाचे** ही प्रशिक्षण दर शनिवारी व रविवारी देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. या प्रशिक्षणाकरिता प्रशिक्षक म्हणुन सौ. उज्वला संबंध यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.



दि. २९ व ३० एप्रिल २०२२ या कालावधीत मुक्तादेवी विद्यामध्ये **मधुमक्षिका पालन** याविषयी **प्रशिक्षण** आयोजित केले होते. या प्रशिक्षणाकरिता इ. वी व ९ वी तील मुली उपस्थित होत्या.

दि. ९ सप्टेंबर २०२२ ते ११ सप्टेंबर २०२२ या कालावधीत मुलींसाठी **योगा प्रशिक्षण शिबीर** आयोजीत करण्यात आले होते. यासाठी अनुजा गायतोंडे व अनुजा जैन या उपस्थित राहुन त्यांनी एकुण ५० मुलींना योगाचे प्रशिक्षण दिले.

दि. २७ जानेवारी २०२३ ते २९ जानेवारी २०२३ या कालावधीत सर्व मुलींना **योगाचे प्रशिक्षण** देण्यात आले. या प्रशिक्षणा करिता श्रीमती अनुजा गायतोंडे व सपना मोरे यांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणात त्यांनी तितली आसन, शिवसिन, मार्जरासन, शिशुआसन, धनुरासन यांसारखी वेगवेगळी आसने शिकविली तसेच वातशमन मुद्रा, शक्ति, सुर्यनमस्कार, ओमकार इ. मुद्रा शिकविल्या तर सुदर्शन





True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Pune- 411 028.

क्रियाही शिकविली. तसेच मुलींच्या मासीक पाळीच्या जनजागृतीसाठी १ नाटीकाही सादर करून जनजागृती केली.

दि. २ फेब्रुवारी २०२३ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र नारोडी चे डॉ. रमेश लहाने सर यांनी वसतीगृहास भेट देऊन सर्व मुलींना आरोग्य, व्हायरल आजार याविषयी माहिती दिली. आहार कोणता घ्यावा याविषयी माहिती दिली. तसेच आभा कार्ड, आभा गोल्डन कार्ड याविषयी माहिती दिली.

**सहल :**

दि. ६ नोव्हेंबर २०२२ रोजी वसतीगृहातील सर्व मुलींना माऊली मंदिर, नारोडी याठिकाणी छोटीसी सहल आयोजित करून देवदर्शनासाठी नेण्यात आले होते.

दि. ५ फेब्रुवारी २०२३ रोजी वसतीगृहातील मुलींची अभ्यास सहल शिवनेरी किल्ला, लेण्याद्री गणपती व ओझर गणपती दर्शन तसेच मणिकडोह येथील बिबट निवारा केंद्र इ. ठिकाणी नेण्यात आली होती. सर्व मुलींनी शिवनेरी किल्याची तसेच लेण्याद्री येथील लेण्यांची पाहणी करून माहिती घेतली व बिबट निवारा केंद्रात बिबटे पाहण्यात आले व त्यांच्याविषयी माहिती घेण्यात आली.





**सण/उत्सव :**

दि. २ ऑगस्ट २०२२ रोजी वसतीगृहातील मुलींनी फुगडया खेळुन नागपंचमी सण साजरा केला. तर दि. ११ ऑगस्ट २०२२ रोजी वसतीगृहातील मुलींनी आपआपल्या भावांना राखी बांधुन रक्षाबंधन सण साजरा केला.

स्वातंत्र्य दिनाचा अमृत महोत्सवी दिनानिमित्त शासनाने अवाहन केल्याप्रमाणे, दि. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत दररोज वसतीगृहात ध्वजारोहण करण्यात आले. तसेच दि. १५ ऑगस्ट २०२२ रोजी संस्थेचे संस्थापक डॉ. दादा गुजर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. या सर्व सणांच्या दिवशी मुलींना गोड जेवण देण्यात आले.

दि. २६ सप्टेंबर २०२२ रोजी नवरात्र उत्सव निमित्त वसतीगृहातीत मुलींकरिता रास दांडियांचा कार्यक्रम घेण्यात आला.

दि. २ ऑक्टोबर २०२२ रोजी वसतीगृहात महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी वसतीगृहातील एकुण ७ मुलींनी महात्मा गांधी विषयी आपले मनोगत व्यक्त केले.

दि. ५ ऑक्टोबर २०२२ रोजी वसतीगृहात मुलींची पुस्तके, शेती अवजारे यांचे पुजन करून दसरा सण तर दि. ९ ऑक्टोबर २०२२ रोजी वसतीगृहात कोजागिरी पौर्णिमेचा सण साजरा करण्यात आला.

दि. १४ नोव्हेंबर २०२२ रोजी वसतीगृहात पंडीत जवाहरलाल नेहरू यांची जयंती (बालदिन) साजरी करण्यात आली. यावेळी वसतीगृहातील एकुण १५ मुलींनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच दि. १५ नोव्हेंबर २०२२ रोजी आदिवासी स्वातंत्र्यवीर बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी वसतीगृहातील एकुण ९ मुलींनी आपली मनोगते व्यक्त केली.

दि. ६ डिसेंबर २०२२ रोजी वसतीगृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन तर २४ डिसेंबर २०२२ रोजी साने गुरूजी यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी अनुक्रमे १० व १५ मुलींनी आपली मनोगते व्यक्त केली.

दि. ३ जानेवारी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी एकुण १५ मुलींनी आपले मनोगत व्यक्त केले. दि. ४ जानेवारी २०२३ रोजी सिंधुताई सपकाळ यांच्या स्मृतिदिनानिमित्त मुलींना सिंधुताई सपकाळ हा चित्रपट दाखविण्यात आला.

True Copy
Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.

दि. १२ जानेवारी २०२३ रोजी राजमाता जिजाऊ आईसाहेब जयंती व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली यावेळी एकुण १४ मुलींनी आपली मनोगते व्यक्त केली.



दि. १९ फेब्रुवारी २०२३ रोजी वसतीगृहात शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले व छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याबाबत वसतीगृहातील एकुण २५ मुलींनी आपली मनोगते व्यक्त केली.

दि. २३ फेब्रुवारी २०२३ रोजी वसतीगृहात संत गाडगेबाबा जयंती साजरी करण्यात आली यावेळी सौ. अश्विनी हगवणे मॅडम यांनी संत गाडगेबाबांच्या कार्याबाबत माहिती सांगितली.



दि. ६ मार्च २०२३ रोजी वसतीगृहात होळी साजरी करण्यात आली व होळी निमित्त सर्व मुलींना गोड जेवण देण्यात आले.

दि. ८ मार्च २०२३ रोजी मुलींनी वसतीगृहात जागतिक महिला दिन साजरा केला. यावेळी एकुण २० मुलींनी आपली मनोगते व्यक्त केली.

दि. २२ मार्च २०२३ रोजी वसतीगृहात गुढीपाडवा सण साजरा करण्यात आला. यादिवशी सकाळी इ. १० वी तील मुलींच्या हस्ते गुढी उभारण्यात आली व मुलींना गोड जेवण देण्यात आले.

देखभाल/दुरूस्तीः

दि. १४ एप्रिल २०२२ रोजी वसतीगृहात मुलींच्या रूम करिता नविन इन्व्हर्टर बसविण्यात आलेला आहे.

दि. ३ जुन २७०२२ रोजी वसतीगृहातील सिसिटीव्ही सर्व्हिसिंग करण्यात आले तर दि. २६ जुन २०२२ रोजी गरम पाण्याच्या सोलरची दुरूस्ती करण्यात आली होती. यामध्ये मागील बादळात फुटलेल्या सोलरच्या सर्व नळ्या बदलण्यात आल्या तर सर्व सोलर ची सर्व्हिसिंग करण्यात आलेली आहे.

दि. २८ जुले २०२२ रोजी वसतीगृहातील सोलर लाईट चे नविन २ दिवे बसविण्यात आलेले आहेत.

वसतीगृहातील पाण्याच्या सोईकरिता नदीवर असणारा श्री. माऊली पिंगळे यांचा मोटारपंप नादुरूस्त झाला होता अहवाल कालावधीमध्ये हा मोटारपंप दुरूस्त करून घेण्यात आला. तसेच वसतीगृहातील सिसिटीव्ही कॅमेरेही दुरूस्त करण्यात आले. वसतीगृहातील किरकोळ इलेक्ट्रिक दुरूस्ती करण्यात आली व लाईटच्या अचानक बदलामुळे ९ ट्युबलाईट खराब झाल्यामुळे त्याठिकाणी नविन ट्युबलाईट बसविण्यात आल्या.

माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये सीसीटिव्ही चा पॉवर सप्लाय खराब झाल्याने तो बदलुन नवा बसविण्यात आला होता. तसेच माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये सिसिटिव्ही चे सर्व्हिसिंग करण्यात आले व गरम पाण्याचा बंब गळत असल्याने तो शिनोली येथुन दुरूस्त करून घेण्यात आला आहे.

श्री. माऊली पिंगळे यांची शेतीसाठी असलेली मोटार बिघडल्याने व त्यामुळे वसतीगृहातील पाणी संपल्याने अहवाल कालावधीत वसतीगृहासाठी २ टॅंकर पाणी विकत घ्यावे लागले. रेन हार्वेस्टिंग पाणी टाकी जवळील मोटार अहवाल कालावधीत बिघडल्याने ही मोटार दुरूस्त करण्यात आली.

अहवाल कालावधीमध्ये वसतीगृहातील मुलींच्या रूम, किचन सभागृह, संगणक रूम, धान्यकोठी यांची वेळोवेळी स्वच्छता करण्यात आली. तसेच परसबागेमधील तण व गवत काढण्यात आले.

अहवाल कालावधीत वसतीगृहातील शेतामध्ये ट्रॅक्टर-रोटर ने शेतजमीनीची मशागत करण्यात आली व त्यामध्ये पालक मेथी, वांगी, मिरची, कोथंबीर, गवार, हरभरा इ. भाजीपाला घेण्यात आला.

वरीलप्रमाणे भिमाशंकर आदिवासी विकास प्रकल्प, डिंभे व मुक्तांगण वसतीगृह, नारोडीचा सन २०२२-२३ चा वार्षीक अहवाल देत आहोत. कळावे,

आपला विश्वासू,

श्री. सुरेश काळे
(प्रकल्प समन्वयक)

Maharashtra Arogya Mandal F-230 (Poona) Hadapsar, Pune-28

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028.

MAHARASHTRA AROGYA MANDAL
Malwadi, Hadapsar, Pune 411028.
Phone - 020 - 29522502, 29522503, 29522504
Website : www.mam.org.in E-mail- secretary@mam.org.in

*Mr. Anil S. Gujar*, Secretary

Ref No. MAM/

Date : 06/02/2024

Maharashtra Arogya Mandal

All Camps Details

| Sr. No. | Date | Camp Name | Count | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | 11/6/2017 | Jaipur Foot | 47 | MAM |
| 2 | 15/8/2017 | Jaipur Foot | 37 | MAM |
| 3 | 7/4/2019 | Jaipur Foot | 52 | MAM |
| 4 | 20/3/2022 | Jaipur Foot | 44 | MAM |
| 5 | 15/4/2022 | Jaipur Foot | 31 | MAM |
| 6 | 7/5/2023 | Jaipur Foot | 51 | MAM |
| | | **Total** | **262** | |

| Sr. No. | Date | Camp Name | Count | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | 16/4/2017 | LN 4 | 217 | MAM |
| 2 | 18/5/2019 | LN 4 | 65 | MAM |
| 3 | 3/1/2020 | LN 4 | 127 | MAM |
| 4 | 5/2/2020 | LN 4 | 42 | Ashta, Sangali |
| 5 | 23/3/2020 | LN 4 | 61 | Jalgaon |
| 6 | Permanent Centre | LN4 31/01/24 | 361 | SGAK |
| | | **Total** | **873** | |

| Sr. No. | Date | Camp Name | Count | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | 22/23/3/2018 | Earring Aids | 163 | MAM |
| 2 | 10/3/2018 | Cancer | 200 | MAM |
| 3 | 8/3/2019 | Cancer | 175 | MAM |

06/2/2024

Maharashtra Arogya Mandal
F-230
(Poona)
Hadapsar, Pune - 28.

TRUE COPY

PRINCIPAL
M.A.M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune-28.

7·3·1

महाराष्ट्र आरोग्य मंडळामध्ये घेण्यात आलेली विविधे शिबीरे

| दिनांक | तपशील | एकूण लाभार्थी | संयुक्त विद्यमाने | शेरा |
|---|---|---|---|---|
| २९.०५.२००९ ते ३१.०५.२००९ | मोफत तिरळेपणा शस्त्रक्रिया | १३३ | पुणे नेत्रसेवा प्रतिष्ठान, सर्व मंगल मधुरम ट्रस्ट, मुंबई | लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड |
| २८.०२.२०१५ व ०१.०३.२०१५ | मोफत तिरळेपणा शस्त्रक्रिया | ३३ | पुणे नेत्रसेवा प्रतिष्ठान | डॉ. दादा गुजर स्मृतीदिनानिमित्त |
| १८,१९ व २० डिसेंबर, २०१५ | मोफत तिरळेपणा शस्त्रक्रिया | १६७ | पुणे नेत्रसेवा प्रतिष्ठान, रोटरी क्लब ऑफ पुणे सारसबाग | लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड ', एशिया बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड |
| १६.०४.२०१७ | एल एन ४ अत्याधुनिक कृत्रिम हात बसविणे | २१७ | रोटरी क्लब ऑफ पुना डाउन टाउन, रोटरी क्लब ऑफ पुणे सारसबाग | ... |
| १९.०५.२०१७ | जयपूर फूट पायाचे माप घेणे **शिबीर** | ८३ | रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर मिडटाउनचे रोटरी लोककल्याण मंडळ व रोटरी क्लब ऑफ पूना डाउन टाउन | ... |
| ११.०६.२०१७ | जयपूर फूट बसविणे शिबीर | ४७ | रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर मिडटाउनचे रोटरी लोककल्याण मंडळ व रोटरी क्लब ऑफ पूना डाउन टाउन | |
| १५.०८.२०१७ | जयपूर फूट बसविणे शिबीर | ३७ | रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर मिडटाउनचे रोटरी लोककल्याण मंडळ व रोटरी क्लब ऑफ पूना डाउन टाउन | |
| १०.०३.२०१८ | कर्करोग तपासणी शिबीर | २०० | रोटरी क्लब ऑफ मेट्रो चॅरिटेबल ट्रस्ट | |
| २२.०३.२०१८ ते २३.०३.१८ | श्रवण यंत्रे बसविणे | १६३ | अली यावर जंग नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ स्पीच अँड हिअरिंग डिसॅबिलीटीज, मुंबई, ससुन जनरल | |

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | हॉस्पिटल, पुणे, औंध सिव्हिल हॉस्पिटल पुणे व रोटरी क्लब ऑफ पुना डाउन टाउन | |
| | | | | |
| ०८.०३.२०१९ | स्तनाचा,गर्भाशयमुखाचा कॅन्सर,रक्तातीलशुगर, हिमोग्लोबीन तपासणी शिबीर | १७५ | रोटरी क्लब ऑफ मेट्रो चॅरिटेबल ट्रस्ट | |
| ०२.०३.२०१९ | रक्तदान शिबीर | ७९ | मआमं व साने गुरुजी आरोग्य केंद्र | |
| ०२.०३.२०१९ | जयपूर फुट पायाचे माप घेणे शिबीर | ४९ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ,पुणे, रोटरी क्लब ऑफ कल्याण (रोटरी दिव्यांग केंद्र ) डिस्ट्रिक्ट ३१४२, रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर मिड टाउन व रोटरी क्लब ऑफ पूना डाउन टाउन | |
| ०४.०३.२०१९ | डॉ. दादा गुजर स्मृती पुरस्कार | | सामाजिक क्षेत्र –डॉ. अनिल अवचट वैद्यकीय क्षेत्र– डॉ. शशिकांत व डॉ. शुभांगी अहंकारी | |
| ०८.०३.२०१९ | महिलांसाठी मोफत हिमोग्लोबीन व रक्तातील साखर, गर्भाशयमुख कर्करोगाची व्ही.आ.ए. पध्दतीने तपासणी, स्तन कर्करोगाची आय.बी.ई. मशिनद्वारे तपासणी | १७५ | साने गुरुजी आरोग्य केंद्र व रोटरी क्लब ऑफ पुणे डाउन टाउन | |
| ०७.०४.२०१९ | मोफत जयपूर फूट पाय बसविणे शिबीर | ४४ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ,पुणे, रोटरी क्लब ऑफ कल्याण (रोटरी दिव्यांग केंद्र ) डिस्ट्रिक्ट ३१४२, रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर मिड टाउन व रोटरी क्लब ऑफ पूना डाउन टाउन | True Copy<br>Principal<br>M. A. M's, Sumatibhai Shah Ayurved Mahavidyalaya, Hadapsar, Pune- 411 028 |
| ०७.०४.२०१९ | ज्येष्ठ नागरिकांकरिता | २०० | रोटरी क्लब ऑफ | डॉ. अल्पना वैद्य, रोटरी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | व्याख्याने व मोफत आरोग्य तपासणी शिबीर | | सारसबाग, म.आ.मं. आयुर्वेद महाविद्यालय | क्लब ऑफ सारसबाग, पुणे उपस्थित होत्या. डॉ. जयश्री टोणगावकर यांनी वृध्दापकाळातील समस्या व त्यांचे निराकरण आयुर्वेदानुसार कसे करावे ह्याबद्दल माहिती दिली. सौ. अर्चना फडणीस- योग तज्ञ- यांनी विविध आसने सोप्या पद्धतीने समजावून सांगितली. डॉ. रमेश उज्वले- यांनी होणारे आजार योग्य आहार व विहार यांच्या माध्यमातून कसे टाळता येतात |
| १८.०५.२०१९ | कृत्रिम हात (LN-4) | ६५ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ व रोटरी क्लब ऑफ पुना डाउन टाउन यांच्या संयुक्त विद्यमाने | एलएन-४ पर्मनंट सेंटर २ रा वर्धापनादिननिमित्त शिबीर आयोजित. |
| | हिरक महोत्सवी कार्यक्रम | | | |
| १३.११.२०१९ | नेत्र तपासणी | ४६३ विद्यार्थी १७ कर्मचारी | महाराष्ट्र आरोग्य मंडळ, कम्युनिटी आय केअर फॉंडेशन व रोटरी क्लब ऑफ पूना डाउन टाउन यांच्या संयुक्त विद्यमाने | नेत्र तपासणी करुन गरजूना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन मा. सपना संजय मुथा तसेच मा. जितु मेहता यांचे हस्ते करण्यात आले. |
| २६.१२.२०१९ | स्तन कॅन्सर तपासणी | ८० लाभार्थी | महाराष्ट्र आरोग्य मंडळ रोटरी क्लब ऑफ साउथ रोटरी क्लब ऑफ हडपसर, रोटरी क्लब ऑफ हडपसर सेंट्रल | शिबीराचे उद्घाटन रोटरीयन श्री. अजय कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे सचिव, श्री. अनिल गुजर, रोटरीयन श्री. रंजत पराडकर, रोटरीयन श्री. महेंद्र लुनिया, रोटरीयन श्री. तरुण मित्तल |
| ०१.०१.२०२० | गर्भाशय पिशवीच्या मुखाचा कर्करोग प्रतिबंधक लसीकरण | ३३४ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ व रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने | शिबीराचे उद्घाटन रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष, रोटरीयन श्री. मुकुंद चिपळुणकर यांच्या हस्ते |

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | करण्यात आले. याप्रसंगी मआमं सचिव, श्री. अनिल गुजर, रो. श्री. मकरंद फडके, रो. भावना चावरे, रो. विवेक कुलकर्णी, डॉ. देशमुख, डॉ. प्रणिता जोशी, श्री. सुरेश गुजर व श्री. भगवान चौधरी उपस्थित होते. |
| ०२.०१.२०२० | स्पेशल कस्टम एक्सटेंडर कॅम्प-एलएन-४ | ४२ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ व रोटरी क्लब ऑफ पुना डाउन टाउन यांच्या संयुक्त विद्यमाने | |
| ०३.०१.२०२० | एल एन-४ कृत्रिम हात बसविणे कॅम्प | ८५ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ व रोटरी क्लब ऑफ पुना डाउन टाउन यांच्या संयुक्त विद्यमाने | या शिबीराचे उद्‌घाटन सहधर्मदाय आयुक्त, श्री. नवनाथ जगतापसाहेब यांच्या हस्ते करण्यात आले. |
| ०४.०१.२०२० | संकल्प सिध्दी प्रतिज्ञा | मआमं च्या साधारणपणे १४० सहकाऱ्यांनी संकल्प सिध्दी प्रतिज्ञा घेतली. | महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या हीरक महोत्सवानिमित्त संस्थेने १०० विविध कॅम्प घेण्याचा संकल्प केला. संस्थेच्या विविध विभागाच्या विभाग प्रमुखांनी त्यांच्या विभागामध्ये घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची थोडक्यात माहिती दिली. | या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. सु. ल. काटे हे होते. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष, श्री. सतीश अग्रवाल, सचिव, श्री. अनिल गुजर, संस्थेचे खजिनदार, डॉ. यशवंत माने उपस्थित होते. संकल्प सिध्दी प्रतिज्ञेचे वाचन डॉ. प्रणिता जोशी यांनी केले. |
| ०९.०१.२०२० | गर्भाशय पिशवीच्या मुखाचा कर्करोग प्रतिबंधक लसीकरण | ५३२ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ व रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने | या कार्यक्रमाचे उद्‌घाटन नगरसेवक, मा. श्री. प्रमोद (नाना) भानगिरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो चॅरिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष, रोटरीयन श्री. मुकुंद चिपळुणकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे सचिव, श्री. अनिल गुजर, रो. श्री. मकरंद फडके, रो. |

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | भावना चावरे, रो. विवेक कुलकर्णी, रो. श्री. सुरेंद्र पारसनीस, डॉ. प्रणिता जोशी, श्री. भगवान चौधरी मुख्याध्यापक, श्री. डी. एम. पाटील, श्री. प्रकाश भापकर व श्रीमती. स्वाती झरेकर उपस्थित होते. |
| ११.०१.२०२० | स्तन कॅन्सर तपासणी | १३७ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ, आस्था संस्था, पुणे व ग्रामीण संस्था पुरंदर | या शिबीराचे उद्‌घाटन संस्थेचे सचिव, श्री. अनिल गुजर व सौ. राजवर्धिनीताई जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी नगरसेवक, श्री. नंदकुमार जगताप, श्री. सागर जगताप, सरचिटणीस, कॉंग्रेस सासवड ,श्री. संदीप जगताप, डॉ. सुशिल देशमुख, डॉ. प्रणिता जोशी, सौ. हेमलता ताकवले, श्री. भगवान चौधरी, आस्था संस्थेच्या सौ.सरोता सोनवणे व सौ. देशपांडे उपस्थित होत्या. |
| १७.०१.२०२० | व्याख्यान-अवयवदाना बाबत जनजागृती | १५० | डॉ. अभिजित देशमुख - रुबी हॉल क्लिनिक यांचे अवयवदान या विषयावर सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय, हॉल क्रं. ७ मध्ये व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. | या व्याख्यानास संस्थेचे सचिव, श्री. अनिल गुजर, श्री. अरुण गुजर, श्री. विठ्ठल सातव, संस्थेचे कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. |
| १९.०१.२०२० | महिलांसाठी मोफत कर्करोग निदान शिबीर | १३१ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ, गुजर स्नेहवर्धिनी व आस्था संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मोफत कर्करोग निदान शिबीर आयोजित करण्यात | या शिबीरास श्री. अजय गुजर व आस्था संस्थेच्या सौ. सरोता सोनवणे उपस्थित होत्या. |

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | आले होते. | |
| २०.०१.२०२० | गर्भाशय पिशवीच्या मुखाचा कर्करोग प्रतिबंधक लसीकरण | ९७ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ व रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. मुक्तादेवी विद्यालय, नारोडी येथे लसीकरण शिबीर घेण्यात आले. | या शिबीरास डॉ. सीमा कालिया, डॉ. सुशिल देशमुख, डॉ. मयूर, डॉ. स्नेहल, डॉ. अमृता, सौ. महेजबीन शेख, सौ. सीता जगताप, सौ. रुपाली गायकवाड उपस्थित होत्या. |
| २६.०१.२०२० | अवयव दान जन जागृती पदयात्रा | ६०० सहभागी | महाराष्ट्र आरोग्य मंडळ, द फेडरेशन ऑफ ऑरगन अँड बॉडी डोनेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अवयव दान जग जागृती पदयात्रा काढण्यात आली. | महाराष्ट्र आरोग्य मंडळ, हडपसर संस्थेच्या साने गुरुजी शैक्षणिक संकुल येथे ७१ वा प्रजासत्ताक दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन द फेडरेशन ऑफ ऑरगन अँड बॉडी डोनेशन या संस्थेचे संस्थापक श्री. पुरुषोत्तम पवार, श्री. सुनील देशपांडे, श्री. शरद दाउतखानी, श्री. नारायण म्हसकर, डॉ. मिलिंद भोसुरे इ. सदस्य उपस्थित होते. श्री. सुनिल देशपांडे यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, परेड, सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विविध द फेडरेशन ऑफ ऑरगन ॲन्ड बॉडी डोनेशन आयोजित अवयवदान जनजागृती पदयात्रा नाशिक ते बेळगाव काढण्यात आलेली आहे. दिनांक २६ जानेवारी, २०२० रोजी ही पदयात्रा पुण्यात आलेली आहे. हडपसरमध्ये अवयवदान जनजागृतीसाठी पदयात्रा काढण्यात आली. साने गुरुजी प्राथमिक विद्यामंदिर,हडपसर शाळेपासून अवयवदान पदयात्रेस सुरुवात झाली. ही पदयात्रा हडपसर पोलीस स्टेशनला वेढा मारुन |

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune-411 028

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | गांधी चौकामध्ये आली. याठिकाणी अवयव दान जनजागृतीसाठी सभा घेण्यात आली. या सभेचे सूत्रसंचालन, श्री. सुरेश गुजर यांनी केले. अवयवदानाचे महत्वपूर्ण काम महाराष्ट्र आरोग्य मंडळाने सन १९९६ पासून सुरुवात केल्याची व संस्थेच्या सामाजिक कार्याची माहिती संस्थेचे चिटणीस, श्री. अनिल गुजर यांनी दिली. अवयदानाचे महत्व व अवयवदानासंबंधी जनतेमध्ये असणारे गैरसमज याबाबत माहिती श्री. पुरुषोत्तम पवार, श्री. सुनिल देशपांडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी उपस्थितांना सांगितली. अवयवदान करण्याची शपथ यावेळी उपस्थितांनी घेतली. अवयवदान पदयात्रेस हडपसरमधील नागरिकांचाही उस्फुर्त पाठिंवा मिळाला. या पदयात्रेमध्ये साने गुरुजी माध्यमिक विद्यालय, इन्स्टिटयुट ऑफ नर्सिंग एज्युकेशन शाळेचे विद्यार्थी, कर्मचारी यांनी सहभाग घेतला. या पदयात्रेमध्ये महाराष्ट्र आरोग्य मंडळ, साने गुरुजी आरोग्य केंद्र, सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय व संस्थेच्या इतर शाळांमधील कर्मचारी व संस्थेशी निगडीत असलेल्या जवळ जवळ ६०० जणांनी अवयवदान पदयात्रेमध्ये सहभाग घेतला. |
| ०२.०२.२०२० | आंतरशालेय कथाकथन स्पर्धा | ३३ शाळा सहभागी एकूण ९९ स्पर्धक | साने गुरुजी प्राथमिक विद्यामंदिर, हडपसर आयोजित | महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या साने गुरुजी प्राथमिक विद्यामंदिर, माळवाडी, हडपसर शाळेमध्ये आंतरशालेय कथाकथन स्पर्धा घेण्यात |

True Copy

Principal
M. A. M's. Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | आल्या. या कथाकथन स्पर्धेमध्ये पुण्यातील एकूण ३३ शाळेमधील एकूण ९९ स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये दोन गट करण्यात आले होते. इ. १ ली ते २ री एकूण ४४ स्पर्धक व इ. ३ री ते ४ थी एकूण ५५ स्पर्धक कथाकथन स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. या स्पर्धेचे उद्घाटन श्री. रमेश वैशंनपायन, बँक ऑफ महाराष्ट्र, सेवानिवृत्त अधिकारी यांनी केले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. दिलीप बरवे, श्री. सविल संकपाळ, अपर्णा निरगुडे व श्री. सुभाष संकपाळ यांनी काम पाहिले. इ.१ली ते २री च्या गटामध्ये वेदांत अशोक ढोले- प्रथम क्रमांक, गारगी संतोष जुन्नरे- द्वितीय क्रमांक व सुश्रुत साईनाथ चितळे- तृतिय क्रमांक मिळविला. इ.३ री ते ४ थी च्या गटामध्ये श्रेया विशाल जगताप- प्रथम क्रमांक, ओम पंडित मोरे- द्वितीय क्रमांक व इश्वरी किसन कुंभार-तृतिय क्रमांक मिळविला. स्पर्धेचे बक्षीस वितरण मा.श्री. जे. पी. देसाई यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे सचिव, श्री. अनिल गुजर, मुख्याध्यापक श्री. सुरेश गुजर, श्री. भगवान चौधरी, सौ. प्रमिला कळसे, सौ. शैलजा सनान्से उपस्थित होते. |
| ०३.०२.२०२० ते ०५.०२.२०२० | बेसिक रिसर्च मेथोडोलॉजी वर्कशॉप | ३९ विद्यार्थी | सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर | महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ मान्य दि.०३.०२.२०२० ते |

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | ०५.०२.२०२० (३दिवसांचे) बेसिक रिसर्च मेथोडोलॉजी वर्कशॉप सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आले होते. प्रोफेसर, डॉ. शरयू कोरे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. डॉ. गवळी, डॉ. शरयू कोरे, डॉ. प्रणिता जोशी, डॉ. भट यांनी वर्कशॉपमध्ये मार्गदर्शन केले. या वर्कशॉपमध्ये आयुर्वेद महाविद्यालयातील एकूण ३९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. |
| ०४.०२.२०२० | महिलांसाठी कॅन्सर तपासणी शिबीर | १०९ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ व आस्था संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने | महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या हिरक महोत्सवानिमित्त जागतिक कर्करोगदिनी दि. ०४.०२.२०२० रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, भोंगवली अंतर्गत उपकेंद्र किकवी, ता. भोर, जि. पुणे येथे महाराष्ट्र आरोग्य मंडळ व आस्था संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मोफत कॅन्सर तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराचा लाभ एकूण १०९ महिलांनी घेतला. यामधील काही महिलांना पुढील तपासणीचा सल्ला दिला. याप्रसंगी महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे डॉ. सुशिल देशमुख, श्री. भगवान चौधरी, आस्था ब्रेस्ट कॅन्सर सपोर्ट ग्रुप, पुणे च्या माधवी सागळे, निलिमा चौगुले, माधवी फडणीस, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, किकवीच्या डॉ. मोनाली लोणकर, गट विकास अधिकारी, श्री. विशाल तनपुरे, पंचायत |

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | समिती भोरचे सभापती, मा. श्रीधर किंद्रे व पंचायत समिती सदस्य, श्री. रोहन भाटे उपस्थित होते. |
| ०५.०२.२०२० | एलएन–४ कृत्रिम हात बसविणे शिबीर | ४२ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ, रोटरी क्लब ऑफ पुणे डाउन टाउन व मा. श्री. अण्णासाहेब डांगे आयुर्वेद मेडिकल कॉलेज, आष्टा, जि. सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने | मा. श्री. अण्णासाहेब डांगे आयुर्वेद मेडिकल कॉलेज, आष्टा जि. सांगली येथे मोफत एलएन–४ कृत्रिम हात बसविण्याचे शिबीर घेण्यात आले. या शिबीरासाठी एकूण ७८ दिव्यांगांनी नांव नोंदणी केली होती. त्यापैकी एकूण ४२ दिव्यांगाना एलएन–४ कृत्रिम हात बसविण्यात आले. शिबीराचे उद्घाटन सांगली जिल्हा सिव्हील सर्जन डॉ. संजय साळुंखे यांचे हस्ते झाले. याप्रसंगी महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे श्री. अमोल झगडे, रोटरी क्लब ऑफ पुना डाउन टाउनचे श्री. रिचर्ड लोबो, श्री. विक्रम मेहंदी, श्री. ओनी काकाजीवाला व आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सत्येंद्र ओझा, डॉ. प्रमोद कणप, डॉ. अमित पेटकर, डॉ. सर्फराज लांगडे, डॉ. सुनिल चव्हाण व डॉ. पत्की उपस्थित होते. |
| ११.०२.२०२० | रॉक ॲण्ड रोल सर्कस | ८ गट सहभागी | साने गुरुजी बालक मंदिर, हडपसर येथे सर्कसचा अनोखा उपक्रम घेण्यात आला. त्यासाठी दोन दिवस पूर्वतयारी | संस्थेचे सचिव, श्री. अनिल गुजर यांनी या सर्कसला आवर्जुन भेट दिली व मुलांचे कौतुक केले. तसेच प्राथमिक विभाग, मुख्याध्यापक, |

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | म्हणून त्याची जाहिरात, पत्रके, प्रवेश पास वाटण्यात आले. तसेच बालवाडी प्रमुख, सहकारी शिक्षिका, आया यांचा समावेश होता. प्राणी, जोकर, वेगवेगळ्या भूमिकेत जवळ जवळ पन्नास मुलांचा सहभाग होता. मुलांच्या विविध सुप्त गुणांचा विकास होण्यासाठी हा उपक्रम घेण्यात आला. तसेच मुलांमध्ये भाषिक कौशल्ये, सृजनशीलता, प्राणीप्रेम, पर्यावरणाची जाणीव व्हावी यासाठी हा उपक्रम घेण्यात आला.<br>या सर्कसचे नाव सुध्दा रॉक ॲण्ड रोल ठेवण्यात आले होते. याचे आकर्षण म्हणजे सहा फुटी बाहुली, दोरीवरील कसरत, रिंग डान्स, जादुचे प्रयोग, विदुषकांच्या विविध करामती, प्राण्यांच्या कसरती व रंजक खेळ, याचा बालचमूंनी मनमुराद आनंद लुटला.. | मा. श्री. सुरेश गुजर यांचे मार्गदर्शन व पालकांचे सहकार्य मोलाचे ठरले |

True Copy

Principal
M. A. M's, Sumatibhai Shah
Ayurved Mahavidyalaya,
Hadapsar, Pune- 411 028